दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ७ वे अंक -२८ | मंगळवार दि.०६ ऑक्टोबर २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४
Beed | Daily | Marathi | Year-7th | Issue- 28 | Tuesday, Dt.06 October 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# १६ ऑक्टोबरपासून राज्यभरात पाणीकपात

मुंबई : अलनिनोच्या प्रभावामुळे यंदा राज्यातील पर्जन्यमानात मोठी घट झाली असून अनेक भागांत पाण्याची उपलब्धता मर्यादित झाली आहे. आगामी काळात पाणीटंचाईची तीव्रता वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन राज्य सरकारने आतापासूनच पाण्याच्या वापरावर नियंत्रण आणण्यास सुरुवात केली असून राज्यातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची कोणतीही टंचाई भासू नये, यासाठी पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. येत्या १६ ऑक्टोबरपासून सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये किमान १० टक्के पाणीकपात लागू करण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती सोमवार दि. ५ ऑक्टोबर रोजी राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.

संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरण्याचे आवाहनही जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी केले आहे. जलसंपदा, महसूल, कृषी, उद्योग आणि नगरविकास विभाग समन्वयाने काम करत असून पालकमंत्री तसेच कालवा सल्लागार समित्यांच्या माध्यमातून पाणीसाठ्याचा नियमित आढावा घेतला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यातील संभाव्य दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी जलसंपदा विभागाने ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंतचा धरणनिहाय आणि वापरनिहाय पाणीसाठा आराखडा तयार केला आहे. उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करताना सर्वप्रथम नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यावर भर देण्यात येणार आहे. भविष्यात पाणीटंचाई निर्माण झाल्यास त्याचा थेट परिणाम नागरिकांवर होऊ नये, यासाठी प्रत्येक धरणातील पाणीसाठ्याचे सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. सरकारच्या माहितीनुसार, सन २०१६ च्या खरीप हंगामातील ट्रिगर-१ लागू झालेल्या राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे.

**मनपा, नगरपालिका, ग्रामपंचायतींना कपातीचे आदेश**

राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपालिका आणि ग्रामपंचायतींना १६ ऑक्टोबरपासून किमान १० टक्के पाणीकपात करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यासोबतच पाणीगळती रोखण्यासाठी विशेष मोहीम तर सांडपाण्याच्या पुनर्वापरावरही भर देण्यात येणार आहे. सांडपाणी प्रक्रिया केंद्रे पूर्ण क्षमतेने चालवून प्रक्रिया केलेले पाणी बागकाम, बांधकाम आणि धुलाईसारख्या कामांसाठी वापरण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**उद्योगांनाही पाणी वापराबाबत निर्बंध**

औद्योगिक क्षेत्रासाठीही सरकारने पाणी वापराबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला असून उद्योगांमध्ये वापरल्या जाणा-या पाण्यापैकी किमान ३० टक्के पाण्याचा पुनर्वापर किंवा पुनर्चक्रण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे उपलब्ध गोड्या पाण्यावरील उद्योगांचा दबाव कमी करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

**अनधिकृत पाणी उपशावर कायदेशीर कारवाई**

धरणे, नद्या आणि कालव्यांमधून होणारा अनधिकृत पाणी उपसा रोखण्यासाठीही कठोर कारवाई केली जाणार आहे. यासाठी महसूल, पोलिस आणि जलसंपदा विभागाची संयुक्त पथके तयार करून गस्त घालण्यात येणार आहे. उपशासाठी वापरले जाणारे पंप आणि इतर साहित्य जप्त केले जाणार आहेत.




### पिण्याच्या पाण्यासाठी राखीव साठा

बाष्पीभवन, गाळ तसेच अनधिकृत पाणी उपसा यामुळे प्रत्यक्ष उपलब्ध पाण्यात होणारी घट लक्षात घेऊन ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याच्या पाण्याचा साठा राखून ठेवला जाणार आहे. भविष्यातील अनिश्चित परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रत्येक धरणात १० टक्के अतिरिक्त आपत्कालीन बफर साठा ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. परिस्थिती अत्यंत गंभीर झाल्यास तांत्रिक तपासणीनंतर मृतसाठ्यातील पाण्याचाही वापर करण्याचा पर्याय खुला ठेवण्यात आला आहे.

### शेतीसाठी पाण्याचे प्राधान्यक्रम निश्चित

दुष्काळी परिस्थितीत शेतीसाठी उपलब्ध होणा-या पाण्याचेही नियोजन करण्यात आले आहे. सर्वप्रथम पिण्याचे पाणी, जनावरांसाठी पाणी आणि चा-याची गरज भागवली जाईल. त्यानंतरच उर्वरित पाण्याचा सिंचनासाठी वापर केला जाणार आहे. रबी हंगामात प्रथम भुसार आणि चारा पिकांना पाणी देण्यास प्राधान्य राहील. त्यानंतर इतर रबी पिकांचा विचार केला जाईल. पाणीसाठा उपलब्ध राहिल्यासच बारमाही पिकांना पाणी देण्यास मंजुरी दिली जाणार आहे.



पुणे - राजस्थानचे राज्यपाल २५ वर्षे परिचित मा. हरिभाऊ बागडे हे पुणे दौऱ्यावर आले असता राजभवन येथे सदिच्छा भेट घेऊन त्यांना शुभेच्छा देताना गोविंद घोळवे मुख्य संपादक बी पॉझिटिव मीडिया प्रायव्हेट लिमिटेड अध्यक्ष संयुक्त महाराष्ट्र मराठी पत्रकार महासंघ मुंबई.

## बीडच्या दुष्काळी परिस्थितीवर ना. पंकजाताई मुंडे यांची जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा



बीड ।प्रतिनिधी

दोन दिवसाचा दुष्काळी दौरा केल्यानंतर राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याशी जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीवर चर्चा करून प्रशासन करत असलेल्या उपाययोजनांबाबत माहिती घेतली. जायकवाडीचे पाणी पाटोदा तालुक्याला देण्याबाबत तसेच पाणी, चारा आणि जलसंवर्धनाची कामे प्राधान्याने हाती घेण्याबाबत त्यांनी जिल्हा प्रशासनाला सूचना दिल्या.

ना. पंकजाताई मुंडे दोन दिवस जिल्ह्यात दुष्काळाची पाहणी करण्यासाठी दौऱ्यावर होत्या, मागील आठवड्यात त्यांनी परळी, अंबाजोगाई, केज चा दौरा केल्यानंतर कालपासून त्यांनी बीड, पाटोदा, वडवणी, धारूर,

पान २ वर...

## जिल्ह्यातील दुष्काळ पाहून ना. पंकजाताई मुंडे हेलावल्या

### शेतकऱ्यांच्या संकटावर व्यक्त केली चिंता

### घाबरू नका ; सरकार पाठिशी आहे ; आवश्यक ती सर्व मदत करण्याचा दिला शब्द

बीड ।प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे आज सलग दुसऱ्या दिवशी शेतकऱ्यांच्या बांधावर होत्या. शेतातील पीक पूर्णपणे हातातून गेले हे सांगताना शेतकऱ्यांच्या भावना अनावर झाल्या होत्या. शेतकऱ्यांवर ओढवलेले संकट पाहून ना. पंकजाताई

पान २ वर...



## विद्यार्थ्यांना ताजा, सकस आहार वेळेत मिळण्यासाठी

# शालेय शिक्षण आणि महिला व बालविकास विभागाने संयुक्त धोरण आखावे -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई ।प्रतिनिधी

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना ताजा, सकस आणि दर्जेदार आहार वेळेत मिळण्यासाठी स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घेण्याचे अधिकार जिल्हास्तरावर द्यावेत. यासाठी शालेय शिक्षण आणि महिला व बालविकास विभागाने संयुक्त धोरण आखून आवश्यक मार्गदर्शक तत्त्वे जारी करावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. सध्या आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना पोषण आहाराचा लाभ देण्यात येतो, त्याऐवजी दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना लाभ देण्याबाबतची व्यवहार्यता तपासून प्रस्ताव सादर करावा, असेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेची आढावा बैठक झाली. शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, महिला व बालविकास विभागाचे सचिव अनुपकुमार, शालेय शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे संचालक अभिषेक कृष्णा, एकात्मिक बाल विकास कार्यक्रम आयुक्त माधवी सरदेशमुख आणि इस्कॉनचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. तर, सर्व महानगरपालिकांचे आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी ऑनलाइन उपस्थित होते.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, आहाराचा दर्जा राखण्यासाठी शहरी भागाबरोबरच ज्या ग्रामीण भागांमध्ये केंद्रीय स्वयंपाकगृहाचा पर्याय व्यवहार्य ठरेल अशा ठिकाणी तो पर्याय स्वीकारावा. दुर्गम आणि आदिवासी भागातील शाळांपर्यंत केंद्रीय स्वयंपाकगृहातून अन्न पोहोचण्यास उशीर लागत असल्याने तेथे ग्रामपंचायतीच्या माध्यमातून इतर पर्याय स्वीकारावेत. केंद्रीय स्वयंपाकगृहाचा पर्याय राबविताना शाळांपर्यंत वेळेत आणि ताजा पोषण आहार पोहोचू शकतो का, याची स्थानिक स्तरावर तपासणी करावी. शक्य तेथे आहार वितरणाची जबाबदारी स्थानिक बचतगटांना द्यावी. संबंधित जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि महानगरपालिका आयुक्तांनी स्थानिक गरजा व व्यवहार्यता लक्षात घेऊन याबाबत निर्णय घ्यावा. आहाराची गुणवत्ता, सेवा आणि देयक व्यवस्थेबाबत स्पष्ट निकष निश्चित करावेत.

शालेय शिक्षण आणि महिला व बालविकास विभागाने जिल्हास्तरावर मागणीचे मूल्यांकन करून दोन्ही विभागांच्या उपलब्ध साधनसामग्रीचा समन्वयाने वापर केल्यास योजनांचा लाभ अधिक प्रभावीपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविता येईल. त्यासाठी आवश्यक प्रशासकीय लवचिकता आणि अधिकार क्षेत्रीय स्तरावर देण्याबाबत विभागांनी निर्णय घ्यावा, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. संयुक्त धोरण तयार करण्यापूर्वी जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सूचना विचारात घेऊन स्थानिक अडचणी व आवश्यक बदल जाणून घ्यावेत. त्यानुसार व्यवहार्य सूचनांचा धोरणात समावेश करुन मंत्रिमंडळासमोर संयुक्त प्रस्ताव सादर करावा, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

पान २ वर...

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## जाहीर निवेदन

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., स्थापत्य विभागीय कार्यालय, लातूर मार्फत नमूद केलेल्या क्षेत्रात ADB योजनेअतर्गत ३३/११ के.व्ही. बीड MIDC उपकेंद्र उभारणीकरिता खालील नमूद ठिकाणी अंदाजे ४० आर (१ एकर) खाजगी जमीन आवश्यक आहे.

करिता संबंधित गाव किंवा गावाजवळील इच्छुक नागरिकांनी आपल्या जमिनीची आवश्यक कागदपत्रे व प्रति एकरी किंमत नमूद करून सीलबंद पाकीट खाली नमूद केल्यानुसार दिनांक ०६.१०.२०२६ ते १३.१०.२०२६ दुपारी १.०० पर्यंत लातूर स्थित **''कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग, महावितरण, कीर्ति गोल्ड मिल समोर, एमआयडीसी, लातूर''** (मो. ७८७५७६२३४६) यांच्याकडे दुपारी सादर करावे.

जमिन ही मुख्य रस्त्यालगत असावी, जमीन सपाट व चौरस असावी. गावापासून १ ते १.५ किमी अंतरावर असावी.दलदलीचे, नाले कालवा जमीन नसावी.कागदपत्राची आवश्यकता खालील प्रमाणे :

१) चालू वर्षातील ७/१२ उतारा २) चालू ८ अ उतारा ३) गाव नकाशा ४) चतुः सीमा नकाशा ५) संमती पत्र रु. १००/- च्या बॉन्डवर ६) नगरपालिका / ग्रामपंचायतीचेवा इतरचे नाहरकत प्रमाणपत्र इत्यादी. ७) एकत्रीत जमीन असल्यास संबंधितांचे नाहरकत प्रमाणपत्र.

**PROLTR No. 136 Dt. 05.10.2026**

**कार्यकारी अभियंता (स्था.) महावितरण, स्थापत्य विभाग, लातूर**

**मो नं - ७८७५७६२३४६**

## संपादकीय....

# पराभवाच्या द्वेषातून विरोधक आले एकत्र..!

देशात लोकसभा निवडणुका झाल्यापासून राहुल गांधी निवडणूक आयोगाच्या विरोधात उभे आहेत. मतचोरी हे प्रारंभी सिद्ध न झाल्याने आता ते एसआयआरविरोधात उभे राहिले आहेत. आता मोर्चे, निदर्शने, रास्ता रोको, आंदोलने तीव्र करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

गेले वर्षभर निवडणूक आयोग विरोधकांच्या रडारवर आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यासोबत निवडणूक आयुक्तांचे मतभेद झाल्याने तो मुद्दा घेऊन सर्व विरोधक आता एकत्र झाले आहेत. हे सर्व पराभवाच्या द्वेषातून उभे आहे. एक-एक राजकीय पक्षाची कुंडली पाहता हे सगळे आश्चर्यकारक घडत आहे. राजकीय पक्ष सोडा, परंतु विद्यार्थ्यांसाठी एकत्र आलेले अभिजीत दीपके यांची कॉकरोच जनता पार्टी ही ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी रस्त्यावर उतरली आहे. मुळात हा पक्ष तरुणांच्या शैक्षणिक प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरला होता. परंतु आता तर सरळ-सरळ सरकारच्या विरोधात विरोधी पक्ष म्हणून खांद्याला-खांदा लावून लढण्यासाठी तयार झाला आहे. त्याचा अनुभव शिवाजी पार्कच्या मोर्च्यात आला. कधी-कधी आश्चर्य वाटते की, जेथे विरोधी पक्ष निवडणूक जिंकत आहे तेथे मात्र निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीचा प्रश्न हे लोक काढत नाहीत. ज्या राज्यात काँग्रेस पुरस्कृत सरकार आहेत. तेथे मात्र ही आंदोलने सुरू नाहीत. मग ज्या ठिकाणी भाजपप्रणित सरकारे आहेत तेथेच हा प्रकार सुरू आहे.

राहुल गांधी यांनी तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सत्तेवरून घालवण्यासाठी चंग बांधला आहे. आता पुढील वर्षात पंजाब, उत्तर प्रदेश, उत्तराखंड व इतर अशा पाच राज्यांत विधानसभेच्या निवडणुका होत आहेत. म्हणून त्यांना निवडणूक आयोगावर ज्ञानेश कुमार हे नको आहेत.

महाराष्ट्रात शिवसेना पक्षामध्ये उभी फूट पडली. ४०-४२ आमदार शिवसेनेमधून बाहेर पडले आणि त्यांनी एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व मान्य केले. पुढे विधानसभेच्या निवडणुका झाल्या आणि त्यामध्ये एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला तब्बल ६२ जागा मिळाल्या आणि मूळ शिवसेनेला २० जागांवर समाधान मानावे लागले. दरम्यानच्या काळात अनेक घटना घडल्या. शिवसेना हे नाव व धनुष्यबाण ही निशाणी एकनाथ शिंदे यांना देण्यात आली. तेथूनच शिवसेना उबाठाने निवडणूक आयोगावर द्वेषाचे राजकारण करीत असल्याचा आरोप केला आहे. पुढे मुंबई महापालिका निवडणुका झाल्या आणि त्यामध्येही शिवसेना उबाठाचे व मनसेचे पानिपत झाले. मुंबई महापालिका ही शिवसेनेच्या दृष्टीने सोन्याची अंडी देणारी कोंबडी होती. मात्र ही कोंबडी हातातून निघून गेल्यानंतर उबाठाची दाणादाण झाली. विशेष आश्चर्य म्हणजे मराठी-अमराठी असे राजकारण करूनही मुंबईच्या जनतेने त्यांना बाहेर ठेवले. भाजप-शिवसेना युतीस भरघोस मतांनी निवडून दिले. या निवडणुकीत मराठीचा मुद्दा घेऊन उबाठा व मनसे एकत्र आले. परंतु मनसेला फारसे यश मिळाले नाही. मुंबई महापालिकेची १५ वर्षांची सत्ता उबाठाच्या हातातून गेल्याने जी आदळआपट सुरू झाली त्यात प्रमुख लक्ष्य निवडणूक आयोग हे झाले आहे. विशेष म्हणजे या प्रकरणावर आजही सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. ही सुनावणी लवकर होत नाही म्हणून उबाठाच्या नेत्यांनी न्यायालयावरही टीकाटिप्पणी केली. आता ही सुनावणी अंतिम टप्प्यात आहे आणि याच पार्श्वभूमीवर उबाठा व मनसे एकत्र येऊन निवडणूक आयोगाच्या विरोधात रविवारी मोर्चा काढत आहेत.

पान १ वरून..

### जिल्ह्यातील दुष्काळ ....

मुंडे यांचे मन देखील हेलावले. अशा परिस्थितीत घाबरू नका, सरकार पूर्णपणे तुमच्या पाठिशी आहे, आवश्यक ती सर्व मदत तुमच्यापर्यंत पोहोचवली जाईल अशा शब्दांत त्यांनी शेतकऱ्यांना आधार दिला. ना. पंकजाताई मुंडे यांनी आज दुसर्या दिवशी मोरवड, पुसरा (वडवणी), तेलगाव (धारूर), नित्रुड, पात्रुड, हरकी लिमगाव (माजलगांव), मारफळा तांडा, अर्धमसला (गेवराई) आदी ठिकाणी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी केली. शेतातील पीके पूर्णपणे हातातून गेल्याने शेतकरी हताश झाला आहे, ना. पंकजाताईंना पाहून अनेक शेतकऱ्यांना अश्रू अनावर झाले.

घाबरू नका, आवश्यक ती सर्व मदत देऊ

राज्य सरकारने राज्यामध्ये दुष्काळ जाहीर केलेला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शेतकरी आणि जनतेला मदत करण्यासाठी विविध उपाय योजना आखत आहेत. त्यामध्ये पीक कर्जांचे पुनर्गठन, जमीन महसूलात सवलत, शालेय विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी, वीज पंपांच्या बिलात सवलत, जलसंधारणाच्या कामांना गती, दुष्काळामुळे वाळलेल्या पिकांचे पंचनामे करून नुकसान भरपाई देणे यासारखी कामे केली जाणार आहेत.हे बळीराजाचे सरकार आहे. त्यामुळे तुम्हाला आम्ही वाऱ्यावर सोडणार नाहीत, आवश्यक ती सर्व मदत तुमच्यापर्यंत पोहोचवू असं पंकजाताई मुंडे यांनी यावेळी सांगत शेतकऱ्यांना आधार दिला.

या दौऱ्यात माजी आमदार केशवराव आंधळे, बदामराव पंडित, माधव निर्मळ, बाळदादा पवार, युद्धजित पंडित, संजय आंधळे, रूपाली कचरे, बाळासाहेब चोले, विनायक रत्नपारखी, अरूण राऊत, नितिन नाईकनवरे, ज्ञानेश्वर मेंडके तसेच उप विभागीय अधिकारी, तहसीलदार उपस्थित होते.

### शालेय शिक्षण आणि....

जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हास्तरीय पोषण आहार समितीची बैठक घेऊन त्या-त्या भागात उपलब्ध असलेल्या प्रथिन समृद्ध खाद्यपदार्थांचा आहारात समावेश करण्याचे नियोजन करावे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी या प्रक्रियेत समन्वय साधावा. स्थानिक आहारपद्धती आणि विद्यार्थ्यांची पसंती लक्षात घेऊन मिलेटयुक्त पदार्थांसह पोषणमूल्य असलेल्या पर्यायांचा विचार करावा, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केंद्रीय स्वयंपाकगृहाची व्याप्ती वाढवावी तसेच ग्रामपंचायतींना निधी देऊन स्थानिक पातळीवर पोषण आहार उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी द्यावी, अशी सूचना केली. तांदळाचे प्रमाण कमी करुन त्याऐवजी इतर धान्यांचे प्रमाण वाढविण्यासाठी केंद्र सरकारकडे मागणी करण्याची विनंती त्यांनी केली. शालेय विद्यार्थ्यांचे हेल्थ कार्ड तयार करण्यात येत असून यापुढे पालकांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी विभागाच्या माध्यमातून शहरी भागात ३० अंगणवाड्यांमध्ये पोषण आहार पुरविण्याचे काम 'इस्कॉन' कडे देण्यात येत असल्याचे सांगितले. याची परिणामकता तपासून अंगणवाड्यांची संख्या वाढविण्यात येणार असल्याचे त्या म्हणाल्या. जिल्हास्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील आहार समितीला स्थानिक परिस्थिती तसेच उपलब्धता विचारात घेऊन पोषण आहार पुरविण्याबाबतचा निर्णय घेण्याचे अधिकार द्यावेत, प्री मिक्स अथवा फोर्टिफाईड पदार्थांऐवजी स्थानिक गरजांनुसार सुटे पदार्थ देऊन ताजा आहार द्यावा अशी सूचना त्यांनी यावेळी केली.

मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी पोषण आहारामध्ये मैदा वापरण्यात येऊ नये, अशी सूचना केली.शालेय शिक्षण विभागाच्या वतीने आयुक्त सचिंद्रप्रताप सिंह, महिला व बालविकास विभागाच्या वतीने एकात्मिक बाल विकास कार्यक्रम आयुक्त माधवी सरदेशमुख यांनी तर अन्नामृत फाऊंडेशनच्या

पान १ वरून..

केंद्रीय स्वयंपाकगृहासंदर्भात इस्कॉनच्या प्रतिनिधींनी सादरीकरण केले.

शालेय शिक्षण विभागामार्फत राज्य व केंद्र शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, खासगी अनुदानित आणि अंशतः अनुदानित ८५ हजार २०६ पात्र शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेचा लाभ देण्यात येतो. केंद्र शासनाच्या निकषांनुसार इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना ४५० उष्मांक आणि १२ ग्रॅम प्रथिनयुक्त, तर इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना ७०० उष्मांक आणि २० ग्रॅम प्रथिनयुक्त दुपारचे भोजन देण्यात येते. आहारात विविधता आणण्यासाठी विविध प्रकारचे पुलाव, खिचडी, उसळ, वरण-भात यांसह १२ प्रकारच्या पाककृती निश्चित करण्यात आल्या आहेत, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

### बीडच्या दुष्काळी .....

माजलगांव, गेवराई या भागात पाहणी करून शेतकऱ्यांना दिलासा दिला. एकंदरीत दौऱ्यात शेतकऱ्यांनी सांगितलेले अनुभव व परिस्थिती यावर त्यांनी आज जिल्हाधिकारी आणि संबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी यांच्यांशी सविस्तर चर्चा केली.

जायकवाडीचे पाणी पाटोद्याला मिळावे

येत्या काही दिवसांत जिल्ह्यात पाण्याचे मोठे दुर्भिक्ष जाणवणार आहे, त्यादृष्टीने आपल्याला तयार रहावे लागेल. जायकवाडीतून पाटोदा तालुक्याला जीपीएस लावून पाणी पुरवठा व्हावा. यात गोंधळ होणार नाही याची दक्षता घ्यावी अशी सूचना त्यांनी केली. रोजगार हमी योजनेतून नद्यांचे खोलीकरण, रुंदीकरण अशी कामे करावीत. भविष्यात पाणी टंचाई होणार नाही अशा पध्दतीने नियोजन करावे असं त्यांनी सांगितलं.

पाणी नसणाऱ्या प्रकल्पाचे ऑडिट करा

जिल्ह्यातील ज्या प्रकल्पात आजच्या स्थितीत अजिबात पाणी नाही अशा प्रकल्पाचे ऑडिट करा जेणेकरून पावसाळ्यात पाणी थांबेल आणि अडचण दूर होईल. बांधकामासाठी मोठ्या प्रमाणावर पाणी लागते गरज भासल्यास अशा कामांना स्थगिती देण्याचा विचार करावा असेही त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करताना सांगितले.

# जयभवानी महाविद्यालयात प्राचीन साहित्य परंपरेवर कार्यशाळा संपन्न

पाटोदा, (प्रतिनिधी) - मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्याच्या पार्श्वभूमीवर मराठीच्या समृद्ध प्राचीन साहित्य परंपरेचा अभ्यास आणि संवर्धन करण्याच्या उद्देशाने पाटोद्याच्या जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात 'मराठीतील प्राचीन साहित्य परंपरा' या विषयावर विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात येऊन महाविद्यालयाच्या 'मराठी विभागाने' मराठी अभिजात भाषा गौरव दिन' साजरा केला.या कार्यशाळेत अभ्यासकांनी मराठी साहित्याच्या प्राचीन परंपरेपासून संत साहित्यापर्यंतच्या विविध पैलूंवर मार्गदर्शन केले.कार्यशाळेचे तज्ज्ञ मार्गदर्शक बीडच्या बलभिम महाविद्यालयाच्या मराठी विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. मनोहर सिरसाट यांनी 'मराठीतील प्राचीन साहित्य परंपरा' या विषयावर सविस्तर मांडणी केली. मराठी भाषेचा ऐतिहासिक प्रवास, तिच्या साहित्य परंपरेची वैशिष्ट्ये आणि प्राचीन साहित्याचे सांस्कृतिक महत्त्व यावर त्यांनी प्रकाश टाकला. मराठी साहित्याची परंपरा ही केवळ भक्तीपर साहित्यापुरती मर्यादित नसून तिच्यामध्ये सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक समृद्धी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यशाळेचे प्रमुख अतिथी शिवाजीनगर, गढीच्या श्री. शिवाजीराव (दादा) पंडित महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी संत जनाबाई यांच्या साहित्याचा अभ्यासपूर्ण आढावा घेतला. संत जनाबाई यांच्या अभंगांमधून व्यक्त होणारी भक्ती, श्रमप्रतिष्ठा, स्त्रीजीवनाचे अनुभव आणि तत्कालीन सामाजिक वास्तव यांची त्यांनी विद्यार्थ्यांना ओळख करून दिली. जनाबाईंच्या साहित्याचे मराठी संतपरंपरेतील महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले.

अभ्यासक प्रा. डॉ. रमेश रिंगणे यांनी 'ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे स्वरूप' या विषयावर मार्गदर्शन केले. संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून मराठी भाषेला दिलेले वैभव

# जिल्हाधिकारी कार्यालयातील अभ्यागतांच्या भेटीच्या वेळेत बदल

## नागरिकांच्या सोयीसाठी नवीन वेळापत्रक जाहीर

बीड (जिमाका)

सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या अडचणी, तक्रारी आणि विविध शासकीय कामांबाबत जिल्हा प्रशासनाशी थेट संपर्क साधता यावा तसेच नागरिकांच्या तक्रारींचे वेळेत निराकरण व्हावे, यासाठी राज्य शासनाच्या निर्देशानुसार आणि महसूल विभागाच्या ९ सप्टेंबर २०२६ रोजीच्या परिपत्रकानुसार जिल्हाधिकारी, बीड यांनी अभ्यागतांच्या भेटीच्या वेळेत बदल केला आहे.

नवीन वेळापत्रकानुसार, नागरिक आता दर सोमवार, बुधवार आणि गुरुवार रोजी दुपारी ०१.०० ते ०२.०० आणि दुपारी ०४.३० ते ०५.३० या वेळेत जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊ शकतील. मंगळवार आणि शुक्रवार हे दोन्ही दिवस जिल्हा दौरा तसेच क्षेत्रीय भेटींसाठी राखीव ठेवण्यात आले आहेत. या दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयात उपलब्ध नसण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी शक्यतो निश्चित केलेल्या भेटीच्या वेळेतच कार्यालयात उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

अत्यंत तातडीच्या किंवा अपरिहार्य शासकीय कामामुळे निर्धारित वेळेत जिल्हाधिकाऱ्यांना भेटणे शक्य न झाल्यास नागरिकांसाठी पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. अशा वेळी नागरिकांनी आपले निवेदन जिल्हाधिकारी कार्यालय येथील निवेदनपेटीमध्ये द्यावे अथवा ८२७५६३९८११ या व्हॉट्सअॅप क्रमांकावर पाठवावे, हे निवेदन जिल्हाधिकारी स्वतः पाहणार आहेत.तरी बीड जिल्ह्यातील सर्व संबंधित नागरिकांनी आणि अभ्यागतांनी याची नोंद घेऊन प्रशासनाला सहकार्य करावे, असे जिल्हा प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.


**जाहिर प्रगटन**
**बीड येथील श्री.रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गेवराई ता. गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दि.अर्ज क. ७८१/२०२६**
**परमेश्वर वि. निरंक**
**ॲड.ए. बी. बांगर**
**अर्जदार -१.परमेश्वर पि पांडुरंग बेदरे, वय - ५५ वर्षे, धंदा-शेती, रा. मादळमोळी, ता. गेवराई जि.बीड**
**विरूध्द**
**निरंक**
**मागणी :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे कायदेशिर वारस म्हणुन प्रमाणपत्र मिळणे बाबत..**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरीलप्रमाणे अर्ज दाखल केला असून, अर्जदार हा मयताचा मुलगा आहे. मयत नामे पांडुरंग पि संभु बेदरे, यांचा मृत्यु दिनांक १०-०७-२०२४ रोजी रा. मादळमोही, ता. गेवराई जि.बीड येथे झाला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु मयत नामे पांडुरंग पि संभु बेदरे, या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहु, नामे पांडुरंग पि संभु बेदरे, यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणून घोषीत करून अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २८/०९/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

पुढील तारीख ०७/११/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई



**जाहिर प्रगटन**
**मा. श्रीमती. एम. पी. मर्डेकर, ४ थे दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १६२५/२०२६**
**समाधान लबासे व इतर वि. निरंक**
**ॲड. वाय.एस.टेकाडे यांच्या मार्फत**

ज्यापेक्षा लक्ष्मण गिताराम लबासे, रा. बहिरवाडी, ता.जि.बीड हे दिनांक १९.०१.२०१७ रोजी सिध्देश्वर नगर, बहिरवाडी, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार

१.समाधान पि. लक्ष्मण लबासे, वय-१९ वर्षे, धंदा- शेती,
२.रामेश्वर पि. लक्ष्मण लबासे, वय-१८ वर्षे, धंदा - घरकाम,
वरील दोघे रा. बहिरवाडी, ता. जि. बीड.

अर्जदारांची मागणी-बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ च्या कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत..

असे की, अर्जदार कं. १ व २ हे मयत लक्ष्मण गिताराम लबासे यांची मुले असुन मयताची पत्नी आई वडील हे फार वर्षापुर्वी मयत झालेले आहेत. अर्जदार कं. १ ते २ यांचे व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत असे वरील अर्जदार यांचे म्हणणे आहे. अर्जदार यांनी मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात त्यांनी हा अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहू मयत लक्ष्मण गिताराम लबासे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख १८/११/२०२६ आहे.

आज रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,बीड

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड



MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

The Executive Engineer (O&M) Division Office Beed on behalf of MSEDCL invites E-tender through e-tendering site for following works.

| Tender No | Name of division | Tender Amount (In Lakhs) | Name of work |
|---|---|---|---|
| BILLING/ EE/BEED/ E-T-17/26-27. | Beed Division | 75 Lakhs | Monthly Meter Reading of LT consumers in area of any PC/Village/Clustershaving below 70% smart meters up to 20kW (Excluding AG consumers other than Ag metered Urban LT consumers coming under Municipal Corporation, Municipal Council , Nagar Parishad and Nagar Panchayat.) under Georai sub division to be done using Mahavitaran Mobile App, IR/RF HHUs ,Bill Printing and Bill distribution up to consumer /consumer premises. for FY 26-27,27-28 & 28-29. |
| BILLING/ EE/BEED/ E-T-18/26-27. | | 75 Lakhs | Monthly Meter Reading of LT consumers in area of any PC/Village/Clustershaving below 70% smart meters up to 20kW (Excluding AG consumers other than Ag metered Urban LT consumers coming under Municipal Corporation, Municipal Council , Nagar Parishad and Nagar Panchayat.) under Ashti sub division to be done using Mahavitaran Mobile App, IR/RF HHUs ,Bill Printing and Bill distribution up to consumer /consumer premises. for FY 26-27,27-28 & 28-29. |
| BILLING/ EE/BEED/ E-T-19/26-27. | | 60 Lakhs | Monthly Meter Reading of LT consumers in area of any PC/Village/Clustershaving below 70% smart meters up to 20kW (Excluding AG consumers other than Ag metered Urban LT consumers coming under Municipal Corporation, Municipal Council , Nagar Parishad and Nagar Panchayat.) under Patoda sub division to be done using Mahavitaran Mobile App, IR/RF HHUs ,Bill Printing and Bill distribution up to consumer /consumer premises. for FY 26-27,27-28 & 28-29. |
| BILLING/ EE/BEED/ E-T-20/26-27. | | 50 Lakhs | Monthly Meter Reading of LT consumers in area of any PC/Village/Clustershaving below 70% smart meters up to 20kW (Excluding AG consumers other than Ag metered Urban LT consumers coming under Municipal Corporation, Municipal Council , Nagar Parishad and Nagar Panchayat.) under Shirur Kasar sub division to be done using Mahavitaran Mobile App, IR/RF HHUs ,Bill Printing and Bill distribution up to consumer /consumer premises. for FY 26-27,27-28 & 28-29. |

The tender document will be available on website from 06.10.2026 to 31.10.2026 the last date of submission of tender is 31.10.2026 up to 15.00 hrs. For details please visit our e-tendering website on http://works.mahadiscom.in/ eTender/etender

**PRO/LTR/138 Dt.05/10/2026** **Executive Engineer, MSEDCL,O&M Division, Beed**



**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ७६७/२०२६**
**गणेश सोपानराव चोपडे व इतर वि. निरंक**
**(मार्फत - ॲड. आर.एल. गवारे)**

ज्याअर्थी मयत नामे लक्ष्मीबाई भ्र. सोपानराव चोपडे, रा. तपेनिमगाव, ता. गेवराई जि. बीड हे/हया दिनांक १७/०५/२०२६ रोजी तपेनिमगाव ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. १ गणेश सोपानराव चोपडे, वय ४० वर्षे, धंदा शेती, रा. तपेनिमगाव ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. २ बाळकिसन पि. सोपानराव चोपडे, वय ४२ वर्षे, धंदा शेती, रा. तपेनिमगाव ता. गेवराई जि.बीड अर्जदार क्र. ३ आसाराम पि. सोपानराव चोपडे, वय ४५ वर्षे, धंदा शेती रा, तपेनिमगाव ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. ४ शोभा भ्र. आसाराम हाके, वय ४३ वर्षे, धंदा घरकाम रा. चोपडेचीवाडी ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. ५ सोपानराव पि. गेणुबा चोपडे, वय ७५ वर्षे, धंदा शेती रा. तपेनिमगांव ता. गेवराई जि.बीड यानी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत लक्ष्मीबाई भ्र. सोपानराव चोपडे यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०३/१०/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

पुढील तारीख - ०७/११/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई



**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ७३७/२०२६**
**भिमराव पि. अर्जुन रोकडे व इतर वि. निरंक**
**(मार्फत - ॲड.ए.बी. बांगर)**

ज्याअर्थी मयत नामे बबन अर्जुन रोकडे, रा. मादळमोही, ता. गेवराई जि.बीड हे/हया दिनांक २४/०८/२०२६ रोजी मादळमोही ता. गेवराई जि.बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. १ भिमराव अर्जुन रोकडे, वय ५८ वर्षे, धंदा शेती, रा. मादळमोही ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. २ शोभा अर्जुन रोकडे, वय ५६ वर्षे, धंदा शेती, रा. मादळमोही ता. गेवराई जि. बीड यांनी शासकीय /निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत बबन अर्जुन रोकडे यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १५/०९/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

पुढील तारीख - ३१/१०/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई



**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ७९५/२०२६**
**सुनिता भ्र. अंबादास खेडकर व इतर वि. निरंक**
**(मार्फत ॲड. आर.एल. गवारे)**

ज्याअर्थी मयत नामे अंबादास पि. लिंबा उर्फ लिंबाजी खेडकर, रा. चव्हाणवाडी, ता. गेवराई जि. बीड हे/हया दिनांक २१/०३/२०२४ रोजी चव्हाणवाडी ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले /झाल्या आहेत, अर्जदार क्र. १ सुनिता भ्र. अंबादास खेडकर, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम, रा. चव्हाणवाडी ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. २ निखील पि. अंबादास खेडकर, वय १७ वर्षे, अपाक आई अर्जदार क्र. १ सुनिता अंबादास खेडकर, रा. चव्हाणवाडी ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. ३ साहिल पि. अंबादास खेडकर, वय १५ वर्षे, अपाक आई अर्जदार क्र. १ सुनिता अंबादास खेडकर, रा. चव्हाणवाडी ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. ४ केसरबाई भ्र. लिंबा उर्फ लिंबाजी खेडकर, वय ७८ वर्षे, धंदा घरकाम, रा. चव्हाणवाडी ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. ५ लिंबा उर्फ लिंबाजी दादाराव खेडकर, वय ८० वर्षे, धंदा घरकाम, रा. चव्हाणवाडी ता. गेवराई जि. बीड यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत अंबादास पि. लिंबा उर्फ लिंबाजी खेडकर यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०३/१०/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

पुढील तारीख - १६/११/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई



**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ७७४/२०२६**
**नाथा पि. संतराम पिसाळ वि. निरंक**
**मार्फत ॲड एल. आर. कर्डिले, गेवराई)**

अर्जदार १.नाथा पि. संतराम पिसाळ
वय ६६ वर्षे, धंदा - शेती
रा. धनगर गल्ली, मोंढानाका, गेवराई ता. गेवराई जि. बीड

ज्याअर्थी मयत आसराबाई भ्र. संतराम पिसाळ हे/हया अनुक्रमे दिनांक ३०/०७/२०२६ रोजी मौजे गेवराई ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत आसराबाई भ्र. संतराम पिसाळ, रा. गेवराई ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०३/१०/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिल.

पुढील तारीखः ०६/११/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

# आरकेएसव्हीएमच्या हॉकी संघांची जिल्हास्तरावर दमदार कामगिरी करत विभागीय स्तरावर धडक



धर्माबाद (अशोक पडोळे)

राजाराम काकानी सहकार विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या हॉकी संघांनी जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये दमदार कामगिरी करत शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील यशाची परंपरा कायम राखली आहे. विविध गटांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत आरकेएसव्हीएमच्या खेळाडूंनी विभागीय स्तरावर धडक मारली आहे.

१४ वर्षांखालील मुलांच्या संघाने जिल्हास्तरीय स्पर्धेत विजेतेपद पटकावत विभागीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली, तर १७ वर्षांखालील मुलांच्या संघाने द्वितीय क्रमांक मिळवला. मुलींच्या गटातही आरकेएसव्हीएमच्या संघांनी उत्कृष्ट कामगिरी केली. १४ वर्षांखालील व १७ वर्षांखालील मुलींच्या संघांनी जिल्हास्तरावर विजेतेपद मिळवत विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले.

आंतरशालेय हॉकी स्पर्धेतही आरकेएसव्हीएमच्या खेळाडूंनी आपली चमक दाखवली. १४ वर्षांखालील मुला-मुलींच्या संघांनी जिल्हास्तरावर विजेतेपद मिळवत विभागीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. तसेच १७ वर्षांखालील मुलींच्या संघाने विजेतेपद, तर १७ वर्षांखालील मुलांच्या संघाने द्वितीय क्रमांक पटकावला.

या उल्लेखनीय यशामागे खेळाडूंचा सातत्यपूर्ण सराव, मेहनत, शिस्त आणि सांघिक भावना यांसोबतच हॉकी क्रीडा शिक्षक श्रीनिवास कांबळे यांचे मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत जिल्हास्तरावर आरकेएसव्हीएमचा ठसा उमटवला.या यशाबद्दल संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक सुबोध काकानी यांनी सर्व खेळाडू, क्रीडा शिक्षक व मार्गदर्शकांचे अभिनंदन करून विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर खडका डॅमची पाईपलाईन परळीच्या पाणी पुरवठ्याला जोडा - दीपक देशमुख



परळी ।प्रतिनिधी

परळी शहरावर संभाव्य पाणीटंचाईचे संकट टाळण्यासाठी खडका डॅम येथून थर्मल पॉवर स्टेशनकडे आलेली पाणीपुरवठा पाईपलाईन परळी शहराच्या विद्यमान पाणीपुरवठा योजनेला जोडावी, अशी मागणी परळीचे माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांनी न.प. प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

परळी शहराला सध्या नागापूर येथील वाण धरणातून पाणीपुरवठा केला जातो. मात्र, उपलब्ध पाणीसाठा अत्यल्प असल्याने भविष्यात पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पर्यायी जलस्त्रोताचे आतापासूनच नियोजन करणे आवश्यक असल्याचे देशमुख यांनी म्हटले आहे.

खडका डॅमची पाईपलाईन विद्यमान पाणीपुरवठा योजनेच्या परिसरात असल्याने तांत्रिक व्यवहार्यता तपासून आवश्यक जोडणी तातडीने करावी, अशी मागणी त्यांनी केली. या पर्यायी व्यवस्थेमुळे दुष्काळाच्या काळात परळीकरांना मोठा दिलासा मिळू शकतो.

# स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांनी केले घरफोडीचे दोन गुन्हे उघड



बीड ।प्रतिनिधी

दिनांक ०५/१०/२०२६ रोजी फिर्यादी नामे आशुतोष नाथ चौबे, वय ३८ वर्ष, व्यवसाय शिक्षक, नारायणा स्कुल, बीड यांनी पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथे फिर्यादी दिली की, बीड येथील शिंदे नगर, फेज ३ मध्ये ते किरायाचे घरामध्ये दुस-या मजल्यावर राहत आहेत. दिनांक ०४/१०/२०२६ रोजी ते त्यांचे घरी झोपलेले असतांना त्यांचे गॅलरी मधील दरवाजाचा कोंडा तोडुन कोणीतरी अज्ञात चोरट्याने त्यांचे घरातील फिर्यादीचा व त्यांचे पत्नीचा मोबाईल असा एकुण २२,०००/- रु किमतीचा मुद्येमाल चोरु घेवुन गेले. वगैरे वर्णनाची फिर्याद दिले वरुन पोलीस स्टेशन शिवाजीनगर गुरनं ३१८/२०२६ कलम ३०४ (२), ३३१ (४) बी.एन.एस. अन्वये दाखल आहे.

सदर गुन्हयाचा समांतर तपास पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांचे आदेशावरुन पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर व त्यांची टिम करत असतांना त्यांना गोपनिय बातमीदार व तांत्रीक पुराव्यावरुन सदरचा गुन्हा हा आरोपी नामे अभिषेक शेषेराव काशीद, वय २४ वर्ष, रा. उ/ सुहास काळे यांचे घरी, चक्रधरनगर, बीड याने केल्याचे निष्पन्न झाले. त्यावरुन सदर आरोपीस ताब्यात घेवुन त्याचेकडुन पोलीस स्टेशन शिवाजीनगर गुरनं ३१८/२०२६ कलम ३०४ (२), ३३१ (४) बी.एन.एस. व पोलीस स्टेशन बीड शहर गुरनं १५१/२०२६ कलम ३०३ (२) बी.एन. एस. असे दोन घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. तसेच सदर आरोपी कडुन एकुण २४,५००/- रु किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.सदरची कामगीरी पोलीस अधीक्षक नवनित कॉंवत, अपर पोलीस अधीक्षक समिर शेख, पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार अर्जुन यादव, पो.अं. अशपाक सयद, मनोज परजणे, विकी सुरवसे, चापोह नितीन वडमारे

# 'लाडकी आई' त्रिदिनी उपक्रमाची संत-महंतांच्या उपस्थितीत सांगता

## मराठा सेवा संघाचे प्रवक्ते बापूसाहेब शिंदे यांच्या 'आई' विषयावरील व्याख्यानाने कार्यक्रमाची सांगता



बीड ।प्रतिनिधी

बालाघाट प्रतिष्ठान जिल्हा बीडच्या वतीने स्व. राजूबाई सोनाजी घोडके यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित 'लाडकी आई' त्रिदिनी कार्यक्रमाची सांगता संत-महंतांच्या उपस्थितीत मराठा सेवा संघाचे प्रवक्ते श्री. बापूसाहेब शिंदे यांच्या प्रभावी 'आई' विषयावरील व्याख्यानाने उत्साहपूर्ण वातावरणात झाली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी ह.भ.प. महंत लक्ष्मण महाराज मेंगडे,( मठाधिपती नेकनूर-पंढरपूर-आळंदी देवाची), ह.भ.प. हरिहर भारती महाराज,( मोरेश्वर संस्थान कोळवाडी,) रामायणाचार्य ह.भ.प. नाना महाराज कदम, ह.भ.प. विष्णुपंत लोंढे महाराज, (संस्कार आश्रम वानगाव फाटा )आदी संत-महंतांसह मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज व स्व. राजूबाई सोनाजी घोडके यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक बालाघाट प्रतिष्ठानचे अध्यक्ष नामदेव घोडके सर यांनी केले. यावेळी त्यांनी स्व. राजूबाई यांच्या स्मृती जपत सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक उपक्रमांच्या माध्यमातून समाजोपयोगी कार्य करण्यामागील भूमिका स्पष्ट केली.

यानंतर धर्मराज रसाळ सर, माजी ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तसेच व्याख्याते बापूसाहेब शिंदे, प्रवक्ते मराठा सेवा संघ, बीड जिल्हा यांनी 'आई' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. आईचे संस्कार, कुटुंबातील आईचे स्थान, बदलत्या सामाजिक परिस्थितीत आईची भूमिका आणि विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत आईचे योगदान यावर त्यांनी प्रभावी विचार मांडले. ह.भ.प. नाना महाराज कदम यांनी उपस्थितांना आशीर्वाद दिला.याप्रसंगी गोपीनाथराव मेंगडे साहेब(, श्री. गुरु बंकट स्वामी आळंदी मठाचे विश्वस्त), शिवाजीराव घोडके(, माजी समाजकल्याण अधिकारी), चंद्रकांत शिंदे, , सुंदर बापू शिंदे, सोमनाथ पाटील, अनिल जाधव, ह.भ.प. तुळशीदास महाराज शिंदे, ह.भ.प. पांडुरंग महाराज शिंदे, कल्याण दाजी शिंदे, बजरंग खाकरे दाजी, शेळके सर, साळुंखे सर, श्रीराम अप्पा घोडके यांच्यासह बालाघाटावरील प्रतिष्ठित नागरिक, महिला भगिनी, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्रिदिनी कार्यक्रमांतर्गत आयोजित विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या बक्षीस वितरणाचा कार्यक्रम मान्यवरांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. शेषराव वाघमारे सर यांनी प्रभावीपणे केले.स्व. राजूबाई सोनाजी घोडके यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित 'लाडकी आई' या त्रिदिनी उपक्रमातून आईच्या प्रेमाचा, संस्कारांचा आणि सामाजिक योगदानाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. आरोग्य, शिक्षण, संस्कार आणि सामाजिक बांधिलकी यांची सांगड घालत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे बालाघाट परिसरात सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी

## हरवलेले व चोरीस गेलेले २३ मोबाईल मूळ मालकांना केले परत



बीड ।प्रतिनिधी

शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत हरवलेले तसेच चोरीस गेलेले मोबाईल फोन शोधून ते त्यांच्या मूळ मालकांना परत करण्याची मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत शिवाजीनगर पोलीस ठाण्याने उत्कृष्ट कामगिरी करत एकूण २३ मोबाईल फोन शोधून काढले.

सदर मोबाईल फोन अपर पोलीस अधीक्षक समीर शेख साहेब यांच्या हस्ते संबंधित मूळ मालकांना परत करण्यात आले. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत साहेब यांच्या सूचनेनुसार जिल्हाभरात हरवलेले व चोरीस गेलेले मोबाईल शोधून ते मूळ मालकांना परत देण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या अधिकारी व अंमलदारांनी तांत्रिक तपासाच्या आधारे २३ मोबाईल शोधून काढले.

पोलिसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, गर्दीच्या ठिकाणी आपल्या मौल्यवान वस्तू व मोबाईल फोनची दक्षतापूर्वक काळजी घ्यावी. शक्यतो गर्दीच्या ठिकाणी मौल्यवान वस्तू घेऊन जाणे टाळावे. गर्दीच्या ठिकाणी नागरिकांचे मोबाईल हरवणे किंवा चोरीस जाण्याच्या घटना घडत असतात.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत साहेब, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख साहेब व उपविभागीय पोलीस अधिकारी राजीव नवले साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, पोलीस अंमलदार दिलीप राठोड व अशोक राडकर यांनी पार पाडली.शिवाजीनगर पोलीस ठाण्याने केलेल्या या उल्लेखनीय कामगिरीचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# जालना-वाटूर महामार्गावरील अतिक्रमणे हटविली

## विरेगाव चितळपुतळी फाटा परिसरात प्रशासनाची कारवाई




जालना शेख फारुक :- जालना-वाटूर राष्ट्रीय महामार्गावरील विरेगाव आणि चितळपुतळी फाटा परिसरात महामार्गाच्या हद्दीत करण्यात आलेली अतिक्रमणे प्रशासनाने हटविली. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल आणि पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. सार्वजनिक बांधकाम विभाग, मोजपुरी पोलिस ठाणे तसेच कल्याण टोलवेजचे अधिकारी व कर्मचारी कारवाईत सहभागी झाले होते.महामार्गावरील वाहतूक सुरळीत राहावी वाहनचालक व नागरिकांची सुरक्षितता अबाधित राहावी आणि वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये यासाठी अतिक्रमणे हटविण्यात आली. कारवाईपूर्वी संबंधित अतिक्रमणधारकांना नियमानुसार सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानंतर यंत्रसामग्रीच्या साहाय्याने महामार्गाच्या हद्दीतील अतिक्रमणे हटविण्यात आली.

या कारवाईमुळे जालना-वाटूर महामार्गावरील वाहतुकीस अधिक मोकळीक मिळणार असून वाहतूक सुरळीत होण्यास मदत होणार आहे. महामार्गाच्या हद्दीत अनधिकृत अतिक्रमण किंवा बांधकाम करू नये तसेच सार्वजनिक वाहतूक आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

**जाहीर प्रगटन**
**ॲड. जे डी पांडव**
**मा. श्रीमती एम. एस पठारे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**
**किरकोळ दिवाणी अर्ज १६१३/२०२६**
**अंजली भागवत निडेबने व इतर विरुध्द निरंक**
**अर्जदार :-**
**(१) अंजली भागवत निडेबने, वय-४६वर्षे, धंदा-घरकाम, रा. श्री अर्पाटमेन्ट, फलॅट नं.४, भक्ती कन्स्ट्रक्शन, पांगरी रोड, बीड ता. जि. बीड**
**२) संस्कार भागवत निडबने, वय-२६ वर्षे, धंदा-खाजगी काम, रा. श्री अर्पाटमेन्ट, फलॅट नं.४, भक्ती कन्स्ट्रक्शन, पांगरी रोड, बीड ता. जि. बीड**
**३) कांचन भागवत निडेबने, वय-३१वर्षे, धंदा-शिक्षण, रा. श्री अर्पाटमेन्ट, फलॅट नं.४, भक्ती कन्स्ट्रक्शन, पांगरी रोड, बीड ता. जि. बीड,**
**४) कोमल भागवत निडेबने, वय-२७वर्षे, धंदा-शिक्षण, रा. श्री अर्पाटमेन्ट, फलॅट नं.४, भक्ती कन्स्ट्रक्शन, पांगरी रोड, बीड ता. जि. बीड**
**५) सारंग भागवत निडेबने, वय-१६ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. श्री अर्पाटमेन्ट, फलॅट नं.४, भक्ती कन्स्ट्रक्शन, पांगरी रोड, बीड ता. जि. बीड, अर्जदार क्र ५हा अज्ञान असल्याने त्यांची अज्ञान पालनकर्ता आई नामे अंजली भागवत निडबने अर्जदार क्र १ या आहेत.**
**६) सुंदराबाई संतराम निडेबने, वय-९५ वर्षे, धंदा-निरंक, रा. उदगीर, ह. मु. श्री अर्पाटमेन्ट, फलॅट नं.४, भक्ती कन्स्ट्रक्शन, पांगरी रोड, बीड ता. जि. बीड**
**विरुध्द निरंक**
**गैर-अर्जदार**
**(अर्जदार व गैरअर्जदार हे भारतीय आहेत)**

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत..

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत भागवत संतराम निडेबने यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत भागवत संतराम निडेबने यांचा मृत्यु दिनांक १८.०८.२०२६ रोजी यशवंतराव चव्हाण मेमोरीयल हॉस्पीटल, पिंपरी चिंचवड, हवेली पुणे येथे मयत झालेले असुन अर्जदार क ०१ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क्रमांक २,३,४ व ५ ही मयताची मुले आहेत व अर्जदार क ६ या मयताच्या आई आहेत. हे मयताचे कायदेशीर वारस आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत भागवत संतराम निडेबने यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०५ ऑक्टोबर २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १८ नोव्हेंबर २०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,बीड

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ८०५/२०२६**
**संगिता भ्र. संतोष गायकवाड व इतर वि. आशाबाई भ्र. शिवाजी शिंदे**
**(मार्फत ॲड ए.एच.ढेंगळे)**

ज्याअर्थी मयत नामे लक्ष्मीबाई भ्र. जनार्धन चव्हाण, रा. आमला, ता. गेवराई जि. बीड हे/हया दिनांक ०९/०८/२०२६ रोजी आमला ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. १ संगिता भ्र. संतोष गायकवाड, वय ४९ वर्षे, धंदा घरकाम, रा. हनुमान नगर, इमामपुर रोड, बीड ता.जि.बीड, अर्जदार क्र. २ संविता भ्र. संजय ढोणे, वय ४२ वर्षे, धंदा घरकाम, रा. धाकलगाव ता. अंबड जि. जालना गैरअर्जदार क्र. आशाबाई भ्र. शिवाजी शिंदे, वय ५२ वर्षे, धंदा घरकाम, रा. आमला ता. गेवराई जि.बीड यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत लक्ष्मीबाई भ्र. जनार्धन चव्हाण यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक ०३/१०/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

पुढील तारीख - १७/११/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

# राज्यस्तरीय रोल बॉल स्पर्धेत बीडचा डबल धमाका; मुलींनी पटकावले उपविजेतेपद, तर मुले ठरले तृतीय



रोल बॉलमध्ये बीडचा बोलबाला! मुलींचे उपविजेतेपद अन् मुलांचा संघ ठरला तृतीय क्रमांकाचा मानकरी

बीड (प्रतिनिधी) : महाराष्ट्र रोल बॉल असोसिएशन व यवतमाळ जिल्हा रोल बॉल असोसिएशन यांच्या वतीने ही स्पर्धा दि. ३ व ४ ऑक्टोबर २०२६ रोजी स्कूल ऑफ स्कॉलर्स, एम.आय.डी.सी. दारव्हा रोड, यवतमाळ येथे घेण्यात आली. या स्पर्धेत राज्यातील ३० हून अधिक जिल्ह्यांच्या संघांनी सहभाग घेतला होता.

यवतमाळ येथे पार पडलेल्या १६ व्या मिनी (११ वर्षांखालील) महाराष्ट्र राज्य रोल बॉल अजिंक्यपद स्पर्धा - २०२६ मध्ये बीड जिल्ह्याने दुहेरी यश संपादन केले आहे. या स्पर्धेत बीडच्या मुलींच्या संघाने उपविजेतेपद (द्वितीय क्रमांक) तर मुलांच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावत जिल्ह्याचा गौरव वाढविला आहे

बीड जिल्हा रोल बॉल असोसिएशन च्या वतीने आतापर्यंत राज्यस्तरीय रोल बॉल स्केटिंग स्पर्धेसाठी जवळपास ४००हून अधिक तर राष्ट्रीय स्पर्धेत २० हून अधिक खेळाडूंची निवड झाली आहे .

मुलींची ऐतिहासिक कामगिरी:

बीडच्या मुलींच्या संघाने साखळी फेरीपासूनच आक्रमक खेळाचे प्रदर्शन करत अंतिम फेरीपर्यंत धडक मारली. अंतिम सामन्यात बीड विरुद्ध मुंबई सिटी अंतिम सामन्यात अटीतटीच्या लढतीत ०६ - ०७ थोडक्यात पराभव स्वीकारावा लागल्याने संघाला द्वितीय क्रमांकावर समाधान मानावे लागले..

उपविजेत्या संघात प्रियल नितीन धांडे(संघ प्रमुख/कर्णधार),आनंदी रमेशवर घोडके, अंझिला अहद शेख, मैत्रेयी अनिकेत कुलकर्णी,श्रेया सतीश बेटकर, रिया प्रवीण कोलंगडे, उमे सलमा झोहरा यांचा समावेश होता.

आनंदी घडके ला मिळाला बेस्ट प्लेअर अवार्ड

मुलांनीही राखली शान:

मुलांच्या गटातही बीडच्या संघाने दमदार खेळ करत तृतीय क्रमांक पटकावला. कांस्यपदकाच्या लढतीत बीडच्या मुलांनी प्रतिस्पर्धी संघाचा पराभव करत हे यश मिळवले.

तृतीय क्रमांकाचा मानकरी मुलांचा संघ

१) जय दिनकर सुपेकर, २) प्रणय सुधीर हजारे, ३) अथर्व दिलीप गोरे, ४) सिदनाक बापूसाहेब वाघमारे, ५) निकुंज राजेश तोष्णीवाल(संघ प्रमुख/कर्णधार), ६) अद्वित प्रदीप ससाणे, ७) राघव रामेशवर घोडके, ८) अनय अमोल मोहळकर, ९) दर्श हरिओम धुप्पड, १०) राज गणेश नहार, ११) हमाद साकिब इम्रान मोमीन

या दोन्ही संघांना प्रशिक्षक वैभव हरिश्चंद्र गिरी, सुधीर शंकरराव हजारे व निकिता कुंडलिक भोसले यांचे मार्गदर्शन लाभले. या घवघवीत यशाबद्दल जिल्हा माजी आमदार सुनीलदादा धांडे,सचिव रामदास अश्रुबा गिरी,शिवसेना बीड जिल्हा संघटक नितीनभैया धांडे,जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर,क्रीडा अधिकारी अनिकेत काळे,चंपावती योगा ग्रुपचे अध्यक्ष बाळासाहेब माने,सागर घोडके ,अन्य शिक्षक पालक वर्ग व क्रीडा प्रेमींनी संघाचे अभिनंदन केले असून पुढील राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# शासकीय कामकाजासह दैनंदिन व्यवहारात मराठीचा अधिकाधिक वापर करा

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचे आवाहन अभिजात मराठी भाषा दिवस सप्ताह उत्साहात

जालना शेख फारुक :- दि.५ मराठी भाषेचे जतन संवर्धन आणि विकास ही प्रत्येक मराठी भाषिकाची जबाबदारी आहे. त्यामुळे दैनंदिन व्यवहार शासकीय कामकाज शिक्षण तसेच सामाजिक जीवनात मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करावा असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.




जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित अभिजात मराठी भाषा दिवस सप्ताहाच्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी जे.ई.एस. महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. राजेंद्र सोनवणे,निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल,उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे,तहसीलदार प्रणाली तायडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.जिल्हाधिकारी मित्तल म्हणाल्या की ३ ऑक्टोबर रोजी मराठी भाषेला अभिजात भाषा म्हणून मान्यता मिळणे हा मराठी भाषा आणि संस्कृतीच्या इतिहासातील अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. महाराष्ट्रासारख्या समृद्ध आणि वैभवशाली राज्यात जन्माला आल्याचा अभिमान वाटतो. मराठी भाषेच्या विकासात मराठी चित्रपटांचेही मोठे योगदान असून त्यातून प्रेरणा मिळते. आपण मुळच्या राजस्थानच्या असलो तरी महाराष्ट्र ही आपली कर्मभूमी असल्याने मराठी भाषा अधिक चांगल्या पद्धतीने शिकण्याचा प्रयत्न करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

पाणी वाचवणे ही काळाची गरज सध्या राज्यावर दुष्काळाचे सावट असून या कठीण परिस्थितीचा सामना सर्वांनी एकजुटीने करणे आवश्यक आहे. भविष्यातील पाणीटंचाई लक्षात घेता प्रत्येकाने पाण्याचा काटकसरीने वापर करावा आणि पाणी वाचवा हा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचवावा असे आवाहनही जिल्हाधिकारी मित्तल यांनी केले.मराठीला जागतिक स्तरावर पोहोचविण्याची गरज

प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे यांनी मराठी भाषेच्या प्राचीन साहित्यिक परंपरेचा आढावा घेतला. मराठी भाषेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील स्वराज्य आणि संस्कृतीचा विस्तार झाला. न्याय आणि समानता प्रस्थापित करण्यात मराठी भाषेचे मोठे योगदान आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून देण्यासाठी अनेक साहित्यिक, लेखक, कवी आणि असंख्य मराठी भाषिकांनी मोलाचे योगदान दिले आहे.

मराठी भाषा केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित न राहता जागतिक स्तरावर पोहोचावी यासाठी प्रत्येकाने आपल्या परीने प्रयत्न करणे गरजेचे आहे. मराठी भाषेला पुढे नेणे हे आपले सामूहिक कर्तव्य असल्याचेही त्यांनी सांगितले.कार्यक्रमास भारत स्काऊट आणि गाईड संस्थेतील विद्यार्थी-विद्यार्थिनी, प्रशिक्षक, शिक्षक तसेच विविध शासकीय विभागांतील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शहागडमध्ये पुन्हा मोकाट कुत्र्यांचा वावर वाढला

शहागड ।प्रतिनिधी

गावात गेल्या काही दिवसांपासून मोकाट कुत्र्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गावातील मुख्य रस्ते, गल्लीबोळ, बाजारपेठ तसेच वर्दळीच्या ठिकाणी कुत्र्यांचे टोळके फिरताना दिसत असल्याने महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.




दीड ते दोन महिन्यांपूर्वी शहागड येथील एका चिमुकल्याला मोकाट कुत्र्याने चावा घेतल्याची घटना घडली होती. या घटनेत चिमुकला गंभीर जखमी झाला होता. या घटनेनंतर मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, पुन्हा गावात कुत्र्यांची संख्या वाढल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

विशेषत सकाळी आणि रात्रीच्या वेळी मोकाट कुत्र्यांचा वावर अधिक जाणवत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. दुचाकीस्वारांच्या मागे कुत्रे लागल्याने अपघात होण्याची शक्यता आहे. तसेच शाळेत ये-जा करणाऱ्या लहान मुलांनाही कुत्र्यांच्या टोळक्यांमुळे भीतीचा सामना करावा लागत आहे.

गावातील कचरा वेळेवर उचलला जात नसल्यास किंवा अन्नकचरा उघड्यावर पडून राहत असल्यास मोकाट कुत्र्यांचा वावर वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे कुत्र्यांच्या बंदोबस्तासोबतच गावातील स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनाकडेही ग्रामपंचायतीने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

ग्रामपंचायतीने गावात तातडीने पाहणी करून मोकाट कुत्र्यांच्या समस्येवर आवश्यक ती उपाययोजना करावी, कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करावे आणि नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे अशी मागणी भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष एकबाल बागवान यांच्यासह शहागडमधील नागरिकांनी केली आहे.

शहागड माझा गाव माझा अभिमान या भावनेतून गावातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाने हा प्रश्न गांभीर्याने घेऊन मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# पंचायत समितीच्या बांधकामाचा स्लॅब कोसळून कामगाराचा मृत्यू

## घनसावंगीतील दुर्घटना नातेवाईकांचा अधिकाऱ्यांवर रोष मृतदेह ताब्यात घेण्यास नकार

घनसावंगी ।प्रतिनिधी

घनसावंगी पंचायत समिती कार्यालयाच्या वरच्या मजल्याचे बांधकाम सुरू असताना स्लॅबचा काही भाग कोसळून एका युवा कामगाराचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना ४ ऑक्टोबर रोजी घडली. आनंद भरपूर राहणार रा.रुई ता. अंबड असे मृत कामगाराचे नाव असल्याचे समजते.

पंचायत समिती कार्यालयाच्या इमारतीवर सुरू असलेल्या बांधकामादरम्यान अचानक स्लॅब कोसळला. यावेळी बांधकामाच्या ठिकाणी काम करणारा आनंद भरपूर राहणार हा कामगार स्लॅबच्या ढिगाऱ्याखाली दबला गेला. या दुर्घटनेत त्याचा जागीच मृत्यू झाला.घटनेची माहिती मिळताच परिसरात खळबळ उडाली. मृत कामगाराच्या नातेवाईकांनी घटनास्थळी धाव घेत पंचायत समिती कार्यालयातील संबंधित अधिकारी व बांधकामाच्या जबाबदारीबाबत तीव्र नाराजी



व्यक्त केली. संबंधितांच्या निष्काळजीपणामुळे ही दुर्घटना घडल्याचा आरोप करीत नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला.

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस प्रशासनाने तत्काळ मध्यस्थी केली. नातेवाईकांशी चर्चा करून परिस्थिती नियंत्रणात आणण्यात आली. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठविण्यात आला.दरम्यान या दुर्घटनेमागे बांधकामातील सुरक्षिततेच्या उपाययोजनांचा अभाव किंवा अन्य काही कारण आहे का याची चौकशी होणे आवश्यक आहे. संबंधित बांधकामाची गुणवत्ता कामगारांच्या सुरक्षेची व्यवस्था आणि कामाच्या ठिकाणी आवश्यक सुरक्षा साधने उपलब्ध होती का याचीही तपासणी करण्याची मागणी होत आहे. या प्रकरणात दोषींवर कारवाई होणार का याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# बारसवाड्यातून मांढर देवीच्या ज्योतीसाठी भव्य प्रस्थान

भक्तीमय वातावरणात ७ ऑक्टोबरला ज्योत यात्रेला सुरुवात १० ऑक्टोबरला पवित्र ज्योतीचे आगमन

बारसवाडा पंढरीनाथ माळकरी :- श्री क्षेत्र मांढर देवीच्या पवित्र ज्योतीचे दर्शन घेऊन ती ज्योत बारसवाडा येथे आणण्यासाठी नवज्योत दुर्गा माता मंडळाच्या वतीने विशेष ज्योत यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या यात्रेला बुधवार ७ ऑक्टोबर २०२६ रोजी बारसवाडा येथून मांढर देवीकडे प्रस्थान होणार आहे.मांढर देवीच्या पवित्र ज्योतीचे दर्शन घेऊन भाविक




१० ऑक्टोबर रोजी पवित्र ज्योत घेऊन बारसवाडा येथे परतणार आहेत. या यात्रेत मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच देवीचे असंख्य भाविक उत्साहाने सहभागी होणार आहेत.यात्रेदरम्यान जय माता दी जय दुर्गा माता च्या जयघोषाने परिसर दुमदुमणार असून भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचे वातावरण निर्माण होणार आहे. पवित्र ज्योतीच्या आगमनाची भाविकांमध्ये मोठी उत्सुकता असून ज्योतीचे भक्तिभावाने स्वागत करण्याची तयारी मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

आईच्या ज्योतीने उजळू दे बारसवाडा भक्ती, श्रद्धा आणि शक्तीचा होऊ दे जयघोष या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या ज्योत यात्रेमुळे बारसवाड्यात धार्मिक आणि भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे.

# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर मायक्रो फायनान्सच्या सक्तीच्या वसुलीला वर्षभर स्थगिती द्या

## अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

जालना ।प्रतिनिधी

दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी महिला बचतगट तसेच सर्वसामान्य नागरिक आर्थिक अडचणीत सापडले आहेत. अशा परिस्थितीत मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून कर्जाच्या हप्त्यांसाठी सुरू असलेली सक्तीची वसुली तातडीने थांबवून किमान वर्षभरासाठी स्थगिती देण्यात यावी अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने केली.यासंदर्भात पंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हतगल यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.दुष्काळामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम झाला असून शेतमालाचे अपेक्षित उत्पन्न न झाल्याने अनेक कुटुंबांची आर्थिक घडी विस्कटली आहे. त्यातच मायक्रो फायनान्स संस्थांकडून कर्जाच्या हप्त्यांसाठी तगादा लावला जात असल्याने कर्जदारांवर अतिरिक्त मानसिक व आर्थिक दबाव निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.सध्याची परिस्थिती लक्षात घेता कर्जदारांना दिलासा देण्यासाठी वर्षभर कर्जवसुलीला स्थगिती देण्याबरोबरच कर्जाचे पुनर्गठन करण्यात यावे अशी मागणीही करण्यात आली. दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून प्रशासनाने याबाबत शासनस्तरावर तातडीने पाठपुरावा करावा अशी अपेक्षा ग्राहक पंचायतीने व्यक्त केली.यावेळी ड. डी. पी. पाटील, ड. महेश



धन्नावत, ड. वसीम शेख, डॉ. देवराव चौरे, डॉ. रमेश तारगे, बाबासाहेब हेमके, सुनील राखुडे आदी उपस्थित होते.

# प्रतिकूल परिस्थितीवर मात करत तहेरीन शेखची वैद्यकीय शिक्षणासाठी निवड

रिक्षाचालक वडिलांच्या कष्टाचे चीज

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) जिद्द, मेहनत आणि प्रतिकूल परिस्थितीशी दोन हात करण्याची तयारी असेल, तर परिस्थिती कितीही कठीण असली तरी यश मिळविता येते, याचा प्रेरणादायी आदर्श आष्टी येथील तहेरीन खलील शेख हिने निर्माण केला आहे. राज्य कोट्यातून मोफत बीएमएस वैद्यकीय शिक्षणासाठी तिची निवड झाल्याबद्दल डॉ. नदीम शेख यांच्या निवासस्थानी तहेरीनचा फेटा बांधून, पुष्पगुच्छ, प्रशस्तिपत्र आणि ५ हजार १ रुपयांचे बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला.

तहेरीनचे वडील खलील शेख हे सर्वसामान्य कुटुंबातील असून रिक्षा चालवून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. आर्थिक परिस्थिती अत्यंत प्रतिकूल असतानाही त्यांनी आपल्या दोन्ही



मुलींना उच्च शिक्षण देण्याचे स्वप्न उराशी बाळगले. आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव असलेल्या तहेरीन आणि तिची बहीण जरीन यांनी बाहेरगावी क्लासेस लावणे आर्थिकदृष्ट्या खर्चिक असल्याने सेल्फ स्टडीच्या माध्यमातून अभ्यास करून हे उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तसेच तहेरीन व जरीन या पीएम श्री जिल्हा परिषद कन्या प्रशाला आष्टी च्या विद्यार्थिनी आहेत. तहेरीनची वैद्यकीय शिक्षणासाठी निवड झाली असून तिची बहीण जरीन इंजिनीअरिंगचे शिक्षण घेणार आहे.

अत्यंत सामान्य आर्थिक परिस्थितीतून आलेल्या या दोन्ही बहिणींनी आपल्या मेहनतीच्या जोरावर मिळविलेले यश कौतुकास्पद असून, त्यांच्या यशामागे आई-वडिलांनी घेतलेल्या कष्टांचा मोठा वाटा आहे. मुलांच्या शिक्षणासाठी परिस्थितीची सबब न सांगता त्यांना सातत्याने प्रोत्साहन देणारे खलील शेख हे खऱ्या अर्थाने आदर्श पालक असल्याचे उपस्थितांनी सांगितले. यावेळी दोन्ही मुलींना उच्च शिक्षण देणाऱ्या खलील शेख यांचाही सत्कार करण्यात आला.

तहेरीनच्या या यशाबद्दल उपस्थित मान्यवरांनी तिचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर प्रतिकूल परिस्थितीवर मात करून तहेरीन व जरीन शेख या बहिणींनी मिळविलेले यश आष्टीतील इतर विद्यार्थ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी असल्याचे उपस्थितांनी नमूद केले. यावेळी डॉ. नदीम शेख, अल्ताफ शेख (मुंबई), पत्रकार मुजाहिद सय्यद, प्रा. ड. फहीम शेख, मोहसीन पठाण, अरबाज बेग, अश्फाक शेख (आयटी मुंबई) यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. तसेच दोन्ही विद्यार्थिनींचे पीएम श्री जिल्हा परिषद कन्या प्रशाला आष्टीच्या, शाळा व्यवस्थापन समितीने व सर्व शिक्षक वृंदांनी अभिनंदन केले आहे.

# हडको बालाजी मंदिर देवस्थानचा २४ व्या ब्रह्मोत्सवा निमित्ताने ,विविध धार्मिक कार्यक्रम

नवीन नांदेड -हडको येथील श्री.बालाजी मंदिर देवस्थान आनंदसागर हौसिंग सोसायटी हडको नवीन नांदेडच्या २४ व्या दसरा ब्रह्मोत्सवा निमित्य दि. ११ ते २० ऑक्टोंबर दरम्यान सकाळी व सायंकाळी दैनंदिन विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, ब्रम्होत्त्सव निमित्ताने रंगरंगोटी व रोषणाई मंदिर परिसरात करण्यात येत आहे.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी, ब्रह्मोत्सवा निमित्य आचार्य पंडिताचा मार्गदर्शना खाली करण्यात येत असून ११ ऑक्टोंबर ते २० ऑक्टोंबर दरम्यान सकाळी ४वाजता सुप्रभात,५ ते ७बालभोग आरती,८ ते १०ध्वजारोहण, देवता स्थापना,कलश स्थापना,अंकुर रोपण, व होम हवन ने सुरुवात होईल व दुपारी २ते ४विष्णुसहस्त्र नाम सायंकाळी ४ते ६ होमहवन होणार तर ब्रम्होत्सव दरम्यान सकाळी दैनंदिन व सायंकाळी विविध धार्मिक कार्यक्रम आयोजन करण्यात आले आहे, बालाजी लक्ष्मी पद्मावती कल्याण उत्सव १५ रोजी श्री बालाजी लक्ष्मी पदमवाती कल्याण उत्सव,१९ रोजी विष्णुसहस्त्र नाम व होमहवन ६ ते ८ मिरवणूक, २० ऑक्टोंबर रोजी दसरा निमित्ताने सकाळी होम हवन,दैवता विसर्जन, पुर्णाहुती, बली प्रदान व प्रसाद वाटप आयोजित करण्यात आला आहे.

होम हवन व कल्याण उत्सव पुरोहित यांच्या मार्गदर्शना खाली यजमान यांच्या उपस्थितीत होणार असून दहा वर्षीय अभिषेक सेवा नोंदणी चालू असून अभिषेक नोंदणी म्हणून शुल्क म्हणून ३१०० रुपये चालु असुन ब्रम्होत्सव मध्ये भाविक भक्तांनी सहभागी होण्याचे व दसरा ब्रह्मोत्सवा निमित्य आयोजित कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष अरुण दमकोंडवार ,उपाध्यक्ष प्रकाशसिंह परदेशी, सचिव माणिकराव देशमुख , कोषाध्यक्ष चंद्रशेखर चोहाण, सहसचिव बालकृष्ण येरगेवार करणसिंग ठाकूर,संतोष वर्मा, संजिवन राजे,अजय भंडारी, विवेकानंद देशमुख,गोवर्धन बियाणी ,सचिन नपाते,सुभाष कारंजकर ,किशोर देशमुख, सतीश मोरे यांनी केले आहे



# वडिलांचे छत्र हरवलेल्या ओंकारला ५१००० ह.रु. ची मदत

अर्धापूर (प्रतिनिधी)

शिक्षण हे असे शस्त्र आहे, ज्याच्या जोरावर आपण जग बदलू शकतो. या विचाराला सार्थ ठरवत जिद्द, चिकाटी आणि आईच्या अपार कष्टांच्या जोरावर अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत तालुक्यातील देगाव येथील ओंकार नागोराव जाधव या गुणवंत विद्यार्थ्याने एमबीबीएस वैद्यकीय शिक्षणापर्यंत मजल मारली आहे. मात्र, वैद्यकीय शैक्षणिक फी व वसतिगृह मेसचा खर्च पेलणे अशक्य झाल्याने त्याच्यावर शिक्षण अर्धवट सोडण्याची वेळ आली होती. काँग्रेसचे नेते तिरूपती (पप्पू) पाटील कोंढेकर यांनी पुढाकार घेऊन ओमकार ला ५१ हजार रुपयांची मदत केली.ओंकारच्या कुटुंबाला या कठीण परिस्थितीत आधार देण्यासाठी समाजातील दानशूर व्यक्ती, सेवाभावी संस्था आणि लोकप्रतिनिधींनी पुढे येऊन या गुणवंत विद्यार्थ्याच्या वैद्यकीय



शिक्षणासाठी मदतीचा हात द्यावा, असे आवाहनही करण्यात आले.

एका गुणवंत विद्यार्थ्याचे डॉक्टर होण्याचे स्वप्न केवळ आर्थिक अडचणीमुळे थांबू नये. समाजातील प्रत्येक संवेदनशील व्यक्तीने आपल्या परीने हातभार लावावा.यासाठी काँग्रेसचे नेते पप्पू पाटील कोंडेकर यांनी पुढाकार घेऊन ५१ हजार रुपयाची मदत केली. तसेच ओंकारचे भविष्य उज्ज्वल होण्यास मदत होईल, असा संदेश यावेळी देण्यात आला. यावेळी येळेगाव गटातील युवानेते सदाशिव पाटील कपाटे,कैलास कपाटे, विश्वनाथ जाधव, व्यंकटेश जाधव,विश्वनाथ जाधव,नवनाथ तिडके, साईनाथ जाधव,हनुमान तिकडे,बब्बलु तिडके,उनकेश्वर जाधव,शिवाजी जाधव यांच्यासह गावकरी मंडळी व पदाधिकारी उपस्थित होते.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अँड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# आदर्श प्राचार्य शिवदास विधाते,आदर्श मुख्याध्यापक साईनाथ बोडखे यांना राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान

## देवगड येथे दिमाखदार पुरस्कार वितरण सोहळा

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे आदर्श ज्येष्ठ प्रशासन अधिकारी तथा महेश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईनालकोल, ता. आष्टी, जि. बीड येथील प्राचार्य श्री. शिवदास गोपीनाथ विधाते तसेच सुदर्शन विद्यालय, सांगवी पाटण, ता. आष्टी, जि. बीड येथील आदर्श मुख्याध्यापक श्री. साईनाथ कारभारी बोडखे यांच्या प्रशासकीय, शैक्षणिक, सामाजिक तसेच विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना प्रतिष्ठेच्या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या दोन्ही पुरस्कारांमुळे आष्टी तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.





शिवस्वराज्य बहुउद्देशीय संस्था, पुनतगाव, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर तसेच आजी-माजी सैनिक कल्याणकारी मंडळ, करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीक्षेत्र देवगड, ता. नेवासा येथे आयोजित करण्यात आलेल्या 'वीर शहीद जवान शौर्य गौरव व मरणोत्तर वीर पत्नी सन्मान सोहळा-२०२६' अंतर्गत रविवार, दिनांक ४ ऑक्टोबर २०२६ रोजी या पुरस्कारांचे दिमाखदार वितरण करण्यात आले.

प्राचार्य श्री. शिवदास गोपीनाथ विधाते यांची 'शिवस्वराज्य राज्यस्तरीय प्रशासन अधिकारी पुरस्कार-२०२६' या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती. प्राचार्य म्हणून शैक्षणिक गुणवत्ता वृद्धिंगत करण्याबरोबरच प्रशासकीय जबाबदाऱ्या प्रभावीपणे पार पाडताना सामाजिक बांधिलकी जपत विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांमध्ये त्यांनी दिलेल्या योगदानाची दखल घेत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. शिस्तबद्ध प्रशासन, विद्यार्थीकेंद्रित शैक्षणिक दृष्टिकोन आणि संस्थेच्या विकासासाठी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे त्यांचा हा सन्मान विशेष उल्लेखनीय ठरला आहे.

त्याचप्रमाणे सुदर्शन विद्यालय, सांगवी पाटणचे आदर्श मुख्याध्यापक श्री. साईनाथ कारभारी बोडखे यांची 'शिवस्वराज्य महाराष्ट्र भूषण महात्मा ज्योतिबा फुले आदर्श शिक्षक पुरस्कार-२०२६' या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती. शिक्षण क्षेत्रासोबतच सामाजिक, क्रीडा, कला, साहित्य, प्रशासकीय कार्य तसेच ग्रामीण विकासाच्या क्षेत्रात त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच शैक्षणिक वातावरण अधिक सक्षम करण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न विशेष कौतुकास्पद ठरले आहेत.

श्रीक्षेत्र देवगड, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर येथे झालेल्या या पुरस्कार वितरण सोहळ्यात बाबा आरागडे, सोनवणे साहेब, सवासे साहेब, वाल्हेकर साहेब, साळवे साहेब, आंबेकर साहेब आदी मान्यवरांच्या शुभहस्ते प्राचार्य शिवदास विधाते व मुख्याध्यापक साईनाथ बोडखे यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल पुरस्कार प्रदान करण्यात आले.

या प्रसंगी राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक राजेंद्र लाड, प्रा. डॉ. जी. पी. बोडखे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक आजिनाथ बोडखे, माणिक कातखडे, शरद राऊत, अनिल घरगिने, मुख्याध्यापक बाळासाहेब दुसुंगे, बाळासाहेब बेरड, राजेश लोंढे तसेच शिवस्वराज्य बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष संजय रामभाऊ वाघमारे व उपाध्यक्ष बाबासाहेब सुरेश शिरसाट यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

प्राचार्य शिवदास विधाते व मुख्याध्यापक साईनाथ बोडखे यांना राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांच्या पुढील सामाजिक, शैक्षणिक व प्रशासकीय वाटचालीस मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. या सन्मानामुळे शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, महेश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईनालकोल आणि सुदर्शन विद्यालय, सांगवी पाटण यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव झाला आहे. आष्टी तालुक्यातील शिक्षण क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय योगदान देणाऱ्या दोन शिक्षणतज्ज्ञांच्या कार्याची राज्यस्तरावर दखल घेतली गेल्याने तालुक्यातील शैक्षणिक वर्तुळात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या दोन्ही पुरस्कारांसाठी झालेल्या निवडीबद्दल महाराष्ट्र भूषण, शिक्षणमहर्षी तथा माजी आमदार श्री. भीमरावजी धोंडे, महेश सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन डॉ. श्री. अजयदादा धोंडे, श्री. अभय राजे धोंडे यांच्यासह शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळातील सर्व प्रशासन अधिकारी, प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षण क्षेत्रातील सहकारी, विद्यार्थी, पालक तसेच रुईनालकोल, दादेगाव, आनंदवाडी-सराटेवडगाव आणि सांगवी पाटण परिसरातील नागरिकांनी प्राचार्य शिवदास विधाते व मुख्याध्यापक साईनाथ बोडखे यांचे अभिनंदन केले आहे.

# डॉक्टरांना धमक्या खंडणीच्या प्रकारांना लगाम घाला

## रुग्णालयात घुसून दबाव सोशल मीडियावर बदनामी आयएमए जालना शाखा आक्रमक

जालना ।प्रतिनिधी

डॉक्टरांना धमकावणे आर्थिक तडजोडीसाठी दबाव आणणे रुग्णालयात घुसून गोंधळ घालणे तसेच सोशल मीडिया आणि प्रसारमाध्यमांवर चौकशीपूर्वीच बदनामी करण्याचे प्रकार वाढत असल्याचा आरोप इंडियन मेडिकल असोसिएशन जालना शाखेने केला आहे. या प्रकारांना तातडीने आळा घालून डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून द्यावे अशी मागणी आयएमएने जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे केली.खासगी रुग्णालये आणि डॉक्टरांवर मानसिक दबाव आणून आर्थिक तडजोडीसाठी भाग पाडण्याचे प्रकार गंभीर असल्याचे आयएमएने निवेदनात म्हटले आहे. उपचारानंतरची बिले न भरणे बिलाची रक्कम कमी अथवा माफ करण्यासाठी प्रशासकीय कर्मचाऱ्यांवर दबाव आणणे धमकावणे अशा घटनांमुळे रुग्णालय प्रशासनासमोर नवी आव्हाने निर्माण होत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.



रुग्णालयात अनधिकृत हस्तक्षेप रुग्ण अथवा त्यांच्या नातेवाइकांशी थेट संबंध नसलेल्या व्यक्तींकडून रुग्णालयात हस्तक्षेप करून गोंधळ घालणे आणि डॉक्टरांवर दबाव आणण्याचे प्रकार होत असल्याचा आरोप आयएमएने केला आहे. वैद्यकीय विषयाचे पुरेसे ज्ञान नसतानाही तक्रारी करून डॉक्टरांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला जात असल्याचेही निवेदनात नमूद आहे.

चौकशीपूर्वीच सोशल मीडियावर बदनामी

एखाद्या डॉक्टरांविरोधात तक्रार झाल्यानंतर अधिकृत चौकशी किंवा वस्तुस्थिती समोर येण्यापूर्वीच सोशल मीडिया आणि इतर माध्यमांवर आरोप केले जात असल्याचे आयएमएने म्हटले आहे. यामुळे डॉक्टरांची सामाजिक प्रतिष्ठा आणि मानसिक स्वास्थ्यावर परिणाम होत असल्याने अशा प्रकारांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

तज्ज्ञांच्या मताला महत्त्व द्यावे

वैद्यकीय निष्काळजीपणाच्या तक्रारींची चौकशी करताना कायदेशीर प्रक्रिया आणि तज्ज्ञांचे मत विचारात घेतले जावे अशी मागणी आयएमएने केली आहे. केवळ दबावाच्या आधारे डॉक्टरांवर कारवाई करण्याऐवजी संबंधित प्रकरणाची वस्तुनिष्ठ चौकशी होणे आवश्यक असल्याचे संघटनेने स्पष्ट केले.

दादागिरी करणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी

रुग्णालयात घुसून गोंधळ घालणाऱ्या डॉक्टर किंवा कर्मचाऱ्यांवर दबाव आणणाऱ्या व्यक्तींविरुद्ध तातडीने गुन्हे दाखल करून कायद्यानुसार कारवाई करावी. तसेच चौकशीपूर्वी सोशल मीडिया किंवा अन्य माध्यमांवर बदनामीकारक मजकूर प्रसारित करणाऱ्यांवरही कारवाई करावी अशी मागणी आयएमएने केली.

पोलीस-आयएमए समन्वयासाठी अधिकारी नेमा

डॉक्टरांच्या सुरक्षेच्या प्रश्नांवर तातडीने संवाद साधता यावा यासाठी पोलीस विभाग आणि आयएमए यांच्यातील समन्वयासाठी स्वतंत्र अधिकारी नियुक्त करावा अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली.

डॉक्टर कायद्याचा आदर करतात मात्र रुग्णसेवा करताना त्यांना धमकी किंवा दबावाच्या वातावरणात काम करावे लागू नये. डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना भयमुक्त वातावरण मिळणे आवश्यक आहे अशी भूमिका आयएमए जालना शाखेने मांडली.आयएमएचे अध्यक्ष डॉ. बळीराम बागल आणि सचिव डॉ. प्रल्हाद धारूरकर यांच्या स्वाक्षरीचे निवेदन जिल्हा पोलीस अधीक्षकांना देण्यात आले. यावेळी आयएमएचे पदाधिकारी, सदस्य आणि प्रतिनिधी मंडळ उपस्थित होते.

# 'दशरथा दशरथा घे हे पायसदान...'च्या गजरात रामजन्माचा सोहळा; शिवनगरी भक्तीरसात न्हाऊन निघाली

माजीमंत्री शिवाजीराव पंडित, माजी आमदार विलासराव खरात यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व भाविक भक्त तल्लीन

गेवराई (प्रतिनिधी) माजी मंत्री शिवाजीराव (दादा )पंडित यांच्या ८९ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित श्रीराम कथा ज्ञानयज्ञ व भव्य कीर्तन महोत्सवात आज रामजन्माचा प्रसंग अत्यंत भक्तिमय आणि भावपूर्ण वातावरणात साकारला. रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर हेरामजन्माचा प्रसंग कथन करत असताना संपूर्ण रामकथा मंडपात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले.रामजन्माच्या प्रसंगाला सुरुवात होताच गायक अच्युत पाटील, विवेक गावंडे, बासरीवादक राम पाटील आणि तबलावादक अक्षय मोरे यांनी 'दशरथा दशरथा घे हे पायसदान...' हे गीत सादर केले. गीताच्या सुरांनी आणि रामनामाच्या गजराने संपूर्ण मंडप दुमदुमून गेला. भाविक भक्तांनी टाळ्यांच्या कडकडाटात आणि 'श्रीराम जय राम जय जय राम'च्या जयघोषात रामजन्माचा आनंदोत्सव साजरा केला. अनेक भाविक या भक्तिमय प्रसंगात अक्षरशः तल्लीन झाले होते.



रामकथेच्या प्रसंगी माजी मंत्री शिवाजीराव पंडित, माजी आमदार विलासराव खरात, शारदा स्पोर्ट्स केडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, ह.भ.प. रघुनाथ महाराज निंबाळकर, ह.भ.प. नामदेव महाराज यांच्यासह अभिष्टचिंतन सोहळा समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने महिला-पुरुष भाविक भक्त उपस्थित होते. रामजन्माच्या मंगल प्रसंगी मंडपातील वातावरण भक्ती, आनंद आणि उत्साहाने भारावून गेले होते.दरम्यान, रामकथा व कीर्तन महोत्सवासाठी कार्यकर्त्यांनी केलेले चोख नियोजनही लक्षवेधी ठरत आहे. भाविकांना कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी विविध पातळ्यांवर नियोजन करण्यात आले असून, दिवसेंदिवस भाविक भक्तांचा वाढता प्रतिसाद मिळत आहे. रामजन्माच्या मंगल प्रसंगाने आज शिवनगरी जणू अयोध्याच झाली होती. रामनामाचा गजर, भक्तांच्या जयघोषाने आणि 'दशरथा दशरथा घे हे पायसदान...' या गीताने संपूर्ण परिसर राममय झाला होता.

## गोदावरीबाई कुंकुलोळ योगेश्वरी कन्या विद्यालयाची कु.भक्ती पवार तलवारबाजीत जिल्हास्तरावर रौप्य पदक मिळवत विभागीय स्तरावर निवड

अंबाजोगाई (प्रतिनिधी):- येथील श्रीमती गोडावरीबाई कुंकुलोळ योगेश्वरी कन्या विद्यालयाची विद्यार्थीनी कु. भक्ती भाऊसाहेब पवार हिने जिल्हास्तरीय तलवारबाजी मध्ये आपली कर्तबगारी दाखवत रौप्य पदकाची कमाई करन या विजयाच्या बळावरच विभागीय स्तरावर खेळण्यासाठी तिची निवड करण्यात आली आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य (पुणे) अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय शालेय तलवारबाजी क्रीडा स्पर्धेत भक्ती भाऊसाहेब पवार हिने उत्कृष्ट कामगिरी करत रौप्य पदक पटकावले आहे. या दैदिप्यमान यशामुळे तिची विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



नुकत्याच दिनांक ०४ ऑक्टोबर २०२६ रोजी तालुका क्रीडा संकुल, अंबाजोगाई येथे पार जिल्हास्तरीय विविध शालेय स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत विविध ठिकाणाहून अनेक विद्यार्थी सहभागी झाले होते. १९ वर्षाखालील मुलींच्या गटात कु. भक्तीने हे यश संपादन केले. कु. भक्ती पवार ही अंबाजोगाई येथील श्रीमती गोदावरीबाई कुंकुलोळ योगेश्वरी कन्या विद्यालयाची विद्यार्थिनी असून तिच्या या यशाबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे. कु. भक्तीला तिच्या प्रशिक्षकासह विद्यालयाच्या मुख्याध्यापक तसेच कुटुंबियांचे मोलाचे सहकार्य तथा मार्गदर्शन लाभले. तिच्या पुढील विभागीय स्पर्धेतील वाटचालीसाठी विद्यालयासह क्रीडा तसेच शैक्षणिक स्तरातून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# दोन हजार विद्यार्थ्यांसाठी अवघे दोन स्वच्छतागृह! पीएमश्री शाळेतील सुविधांचा बोजवारा

### ७०० ते ८०० विद्यार्थिनींच्या स्वच्छतागृहाचा प्रश्न गंभीर; दोन महिन्यांपासून पाणी फिल्टर प्लांट बंद

तामसा (प्रतिनिधी)

शासनाकडून शाळांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला जात असल्याचे सांगितले जाते. मात्र, हदगाव तालुक्यातील नामांकित पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कूल, तामसा येथे विद्यार्थ्यांच्या संख्येच्या तुलनेत स्वच्छतागृहांची कमतरता आणि पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर बनली आहे. जवळपास दोन हजार विद्यार्थी आणि ६० ते ७० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी अत्यल्प स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध असल्याने विद्यार्थ्यांसह शिक्षकांचीही मोठी गैरसोय होत आहे. त्यामुळे शासनाच्या शैक्षणिक योजनांचा लाभ प्रत्यक्षात विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचतो आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

मुलींच्या स्वच्छतागृहाचा प्रश्न ऐरणीवर

या शाळेत माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या जवळपास ७०० ते ८०० असल्याचे सांगण्यात येते. एवढ्या मोठ्या संख्येने विद्यार्थिनी शिक्षण घेत असताना त्यांच्यासाठी पुरेशी व स्वतंत्र स्वच्छतागृहांची व्यवस्था नसल्याची बाब चिंताजनक आहे. स्वच्छतागृहांच्या अपुऱ्या सुविधांमुळे विद्यार्थिनींची कुचंबणा होत असून, त्यांना मूलभूत सुविधांसाठीही अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे चित्र आहे. शाळेतील महिला कर्मचाऱ्यांनाही स्वच्छतागृहासाठी शाळेबाहेर जावे लागत असल्याची परिस्थिती असल्यास, ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने गंभीर मानली पाहिजे.

दोन हजार विद्यार्थ्यांसाठी अपुरी व्यवस्था

विद्यार्थ्यांची संख्या जवळपास दोन हजार, शिक्षक व कर्मचाऱ्यांची संख्या ६० ते ७० आणि उपलब्ध स्वच्छतागृहांची संख्या अत्यल्प, असे विदारक चित्र समोर येत आहे. विद्यार्थ्यांच्या संख्येच्या तुलनेत स्वच्छतागृहांची व्यवस्था अपुरी असल्याने विद्यार्थ्यांना प्रतीक्षा करावी लागते, तर शिक्षक व कर्मचाऱ्यांनाही गैरसोयींचा सामना करावा लागतो. शाळेत मुला-मुलींसाठी स्वतंत्र, स्वच्छ आणि पुरेशा संख्येने स्वच्छतागृहे उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे.

दोन महिन्यांपासून फिल्टर प्लांट बंद

केवळ स्वच्छतागृहांचाच प्रश्न नसून विद्यार्थ्यांच्या पिण्याच्या पाण्याची सुविधाही अडचणीत असल्याचे समोर आले आहे. विद्यार्थ्यांना स्वच्छ पिण्याचे पाणी मिळावे, यासाठी उभारण्यात आलेला फिल्टर प्लांट मागील दोन महिन्यांपासून बंद अवस्थेत असल्याने विद्यार्थ्यांना साध्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने पिण्याच्या स्वच्छ पाण्याची सुविधा अत्यंत महत्त्वाची असताना संबंधित यंत्रणेने याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे.

नामांकित शाळा, पण मूलभूत सुविधांचा अभाव!

पीएमश्री योजनेअंतर्गत निवड झालेली ही शाळा गुणवत्ता आणि शैक्षणिक प्रगतीच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जाते. हदगाव तालुक्यातीलच नव्हे, तर मराठवाड्यात जिल्हा परिषद शाळांमधील मोठ्या विद्यार्थीसंख्येच्या शाळांपैकी एक म्हणून तिची ओळख असल्याचे सांगितले जाते. मात्र, एवढ्या मोठ्या शाळेत विद्यार्थ्यांना स्वच्छतागृहे आणि पिण्याचे स्वच्छ पाणी यांसारख्या मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत असेल, तर ही बाब चिंताजनक आहे.

शासनाकडून शाळांच्या विकासासाठी विविध योजना राबविल्या जात असताना प्रत्यक्ष शाळेतील मूलभूत सुविधांची ही स्थिती का, असा प्रश्न पालक व नागरिकांकडून उपस्थित केला जाऊ शकतो. शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेऊन आवश्यक स्वच्छतागृहांची उभारणी, मुला-मुलींसाठी स्वतंत्र व्यवस्था, महिला कर्मचाऱ्यांसाठी सुविधा आणि बंद पडलेला फिल्टर प्लांट तातडीने सुरू करण्याची मागणी होत आहे.

शिक्षणाबरोबरच मूलभूत सुविधाही द्या!

विद्यार्थ्यांना केवळ दर्जेदार शिक्षण देणे पुरेसे नसून त्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि आरोग्यदायी वातावरण उपलब्ध करून देणेही तितकेच आवश्यक आहे. त्यामुळे शिक्षण विभाग, जिल्हा परिषद प्रशासन आणि संबंधित अधिकाऱ्यांनी या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने पाहणी करावी आणि विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी पुढे येत आहे. आता प्रशासन या समस्येकडे कधी लक्ष देणार आणि विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा कधी मिळणार, याकडे पालकांचे लक्ष लागले आहे.



# जे.के.कलेक्शनच्या लिफ्ट अपघाताची सखोल चौकशी करा

## मनसे जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके यांचे पोलिस अधीक्षकांना निवेदन परवानग्या,फिटनेस व सुरक्षा व्यवस्थेची तपासणी करण्याची मागणी

परतूर ।प्रतिनिधी

परतूर शहरातील जे.के. कलेक्शनच्या चार मजली इमारतीतील तिसऱ्या मजल्यावर लिफ्ट कोसळून झालेल्या गंभीर अपघाताची तातडीने चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रकाश बापू सोळंके यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी सोमवारी ५ जालना येथील पोलिस अधीक्षक तसेच परतूर पोलिस ठाण्याच्या निरीक्षकांना निवेदन दिले.जे.के. कलेक्शनच्या इमारतीच्या बांधकामासह लिफ्ट बसविण्यासाठी आवश्यक शासकीय परवानग्या घेण्यात आल्या आहेत का लिफ्टची नियमित तांत्रिक तपासणी झाली आहे का आणि सुरक्षा निकषांचे पालन करण्यात आले आहे का याबाबत मनसेच्या वतीने यापूर्वीच संबंधित प्रशासनाकडे तक्रार करण्यात आल्याचे सोळंके यांनी निवेदनात नमूद केले आहे.दरम्यान सोमवारी याच इमारतीतील तिसऱ्या मजल्यावर लिफ्ट कोसळल्याची घटना घडली. या अपघातात काही व्यक्ती गंभीर जखमी झाल्याची प्राथमिक माहिती असून घटनेचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे या प्रकरणाची केवळ औपचारिक चौकशी न करता तांत्रिक व प्रशासकीय बाबींचीही सखोल तपासणी करणे गरजेचे असल्याचे सोळंके यांनी म्हटले आहे.लिफ्टच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह लिफ्टचा अपघात नेमका कोणत्या कारणामुळे झाला त्यामध्ये तांत्रिक बिघाड होता का देखभाल-दुरुस्ती वेळेवर करण्यात आली होती का तसेच लिफ्ट वापरण्यास सक्षम असल्याचे प्रमाणपत्र संबंधितांकडे होते का याचा तपास करण्याची मागणी करण्यात आली आहे. इमारतीचा बांधकाम व वापर परवाना लिफ्ट बसविण्याच्या परवानग्या फिटनेस प्रमाणपत्र सुरक्षा प्रमाणपत्र आणि देखभाल-दुरुस्तीचे रेकॉर्ड तपासावे अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.घटनेची माहिती घेण्यासाठी जे.के. कलेक्शनचे मालक सुनील कासट यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला मात्र दूरध्वनीवर त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नसल्याचे निवेदनात नमूद आहे. त्यामुळे अपघातातील जखमींची संख्या लिफ्टची तांत्रिक स्थिती आणि दुर्घटनेमागील नेमके कारण याबाबत अधिकृत माहिती समोर येणे आवश्यक आहे.पुरावे सुरक्षित ठेवण्याची मागणी घटनेनंतर घटनास्थळ सुरक्षित करून तेथील सीसीटीव्ही फुटेज संबंधित कागदपत्रे लिफ्टचे तांत्रिक रेकॉर्ड तसेच अन्य महत्त्वाचे पुरावे सुरक्षित ठेवावेत. प्रत्यक्षदर्शी आणि जखमींचे जबाब नोंदवून अपघाताची कारणमीमांसा करावी अशी मागणीही सोळंके यांनी केली आहे.लिफ्टमध्ये आवश्यक सुरक्षा यंत्रणा बसविण्यात आली होती का तांत्रिक मानकांचे पालन झाले होते का आणि संबंधित यंत्रणेने वेळोवेळी तपासणी केली होती का याची सक्षम तांत्रिक अधिकाऱ्यांमार्फत स्वतंत्र तपासणी करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

दोष आढळल्यास कारवाईची मागणी या प्रकरणात निष्काळजीपणा, हलगर्जीपणा



अथवा नियमांचे उल्लंघन झाल्याचे तपासात निष्पन्न झाल्यास संबंधितांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी. भविष्यात अशा दुर्घटनांची पुनरावृत्ती होऊन नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होऊ नये यासाठी प्रशासनाने या घटनेकडे गांभीर्याने पाहावे अशी भूमिका सोळंके यांनी मांडली.

दरम्यान निवेदनासोबत घटनास्थळाचे जिओ-टॅग फोटो, व्हिडिओ तसेच लिफ्टच्या नुकसानीचे फोटो व व्हिडिओ पुरावे म्हणून सादर करण्यात आले आहेत. या पुराव्यांची अधिकृत नोंद घेऊन तपासात त्यांचा उपयोग करावा आणि पोलिसांनी केलेल्या पुढील कार्यवाहीची लेखी माहिती द्यावी अशी मागणी मनसे जिल्हाध्यक्ष प्रकाश बापू सोळंके यांनी केली आहे.

# ओबीसी समाजाच्या हक्कांसाठी जातनिहाय जनगणनेचा एल्गार

आरक्षणासह स्वतंत्र मंत्रालयाची मागणी भोकरदन येथे ओबीसी समाजाची चिंतन बैठक

भोकरदन इसरारखान पठाण :- ओबीसी समाजाच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी समस्त ओबीसी समाजाच्या वतीने रविवारी ४ भोकरदन येथे चिंतन बैठक घेण्यात आली. जातनिहाय जनगणना लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण स्वतंत्र मंत्रालय तसेच निधी व शिष्यवृत्तीच्या मागण्यांसाठी समाजाने एकजुटीने पुढाकार घेण्याचे आवाहन या वेळी करण्यात आले.

पिसे कॉम्प्लेक्ससमोरील शासकीय विश्रामगृहात दुपारी बाराला झालेल्या या बैठकीस ओबीसी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. ओबीसी समाजचिंतक ड. एफ. एच. सिरसाठ यांनी प्रमुख मार्गदर्शन केले. समता परिषद जाफ्राबादचे तालुकाध्यक्ष नंदकिशोर जाधव, माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गणेश हरकळ, क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष महेंद्र बेराड, ज्येष्ठ सामाजिक विचारवंत अभिजीत भारती, महाराष्ट्र ग्रामीण व शहरी श्रमिक इमारत बांधकाम कामगार संघाचे संस्थापक अध्यक्ष महादू सुरडकर, परीट धोबी सेवा मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष धोंडीराम पैठणकर आणि ओबीसी हक्क परिषदेचे तालुका संघटक विश्वनाथ वर्पे यांची प्रमुख उपस्थिती होती.

लोकसंख्येची माहिती मिळाल्याशिवाय न्याय्य वाटप शक्य नाही



मार्गदर्शन करताना ड. सिरसाठ यांनी जातनिहाय जनगणनेची गरज अधोरेखित केली. देशात पशु-पक्षी व जनावरांची जनगणना केली जाते मात्र मोठ्या लोकसंख्येचा भाग असलेल्या ओबीसी समाजाची जातनिहाय जनगणना होत नाही. नैसर्गिक साधनसंपत्ती शिक्षण, रोजगार आणि राजकीय प्रतिनिधित्वामध्ये न्याय्य वाटा मिळण्यासाठी ओबीसी समाजाची जातनिहाय जनगणना तातडीने करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

लोकसभा, राज्यसभा, विधानसभा आणि विधानपरिषदेत लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळावे, वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी, व्यावसायिक व तंत्रशिक्षणात प्रमाणानुसार आरक्षण लागू करावे तसेच महाराष्ट्रात ओबीसी समाजाच्या विकासासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करावे अशी मागणीही या वेळी करण्यात आली.

सारथी, बार्टी आणि महाज्योतीच्या धर्तीवर ओबीसी समाजासाठीही लोकसंख्येच्या प्रमाणात निधी व शिष्यवृत्ती उपलब्ध करून द्यावी अशी मागणी बैठकीत करण्यात आली. समाजाच्या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष न दिल्यास आंदोलनात्मक भूमिका घेऊन रस्त्यावर उतरण्याची तयारी ठेवावी असे आवाहनही करण्यात आले.

या वेळी विश्वनाथ वर्पे, अभिजीत भारती, महेंद्र बेराड, महादू सुरडकर, मदनराव कुलकर्णी, एकनाथ भराड, अरुण गवळी, भाऊसाहेब साठे यांच्यासह ओबीसी समाजाचे कार्यकर्ते व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीच्या बॅनरवर छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, सावित्रीबाई फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा झळकत होत्या. 'एकच पर्व... ओबीसी सर्व' असा संदेश देत समाजाच्या एकजुटीवर भर देण्यात आला.कार्यक्रमाचे प्रस्ताविक व सूत्रसंचालन अभिजीत भारती यांनी केले. मदनराव कुलकर्णी यांनी आभार मानले.




# बाबुरावजी आडसकर महाविद्यालयाची पुनम घुले जिल्हास्तरीय थाळी फेक स्पर्धेत द्वितीय सर्व स्तरातून होत आहे कौतुकाचा वर्षाव

केज/प्रतिनिधी

केज शहरातील बाबुरावजी आडसकर महाविद्यालयाने क्रिडा स्पर्धेत आपला यशस्वी ठसा निर्माण केला असून डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छत्रपती संभाजी नगर यांनी आयोजित केलेल्या क्रीडा स्पर्धेत दि.०५ आक्टोबर २०२६ रोजी बीड येथे संपन्न झालेल्या थाळी फेक स्पर्धेत महाविद्यालयाची विज्ञान शाखेच्या प्रथम वर्षात शिकत असलेली विद्यार्थींनी पुनम रामेश्वर घूले ही द्वितीय आली असुन तिची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

तिच्या या नेत्रदीपक यशाबद्दल छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव श्री. रमेशराव आडसकर, विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या सौ. अर्चनाताई आडसकर, प्राचार्य डॉ.अनिल किर्दत यांनी अभिनंदन व कौतुक केले आहे.या विद्यार्थीनींस कार्यालय अधिक्षक पी.एस.भोसले,वरीष्ठ लिपिक डी.एस.यादव, डॉ.सौ.बोबडे मडम,डॉ. सौ.गंगणे मडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.पुनम घुले ला मिळालेल्या यशानंतर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत असुन सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

# दुष्काळग्रस्त आष्टी,पाटोदा,शिरूरसाठी तातडीचे दुष्काळ निवारण पॅकेज द्या;माजी आ.भीमराव धोंडे यांचा राज्यपालांकडे पत्रव्यवहार

पीक नुकसानीसाठी एकरी ५० हजार, फळबागांसाठी एक लाख;पशुपालकांना चारा-पाणी अनुदान, शेतमजुरांना २५ हजारांची मागणी

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यांमध्ये दुष्काळाची तीव्रता वाढत असून, शेतकरी, पशुपालक, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिकांना तातडीने मदत मिळणे गरजेचे आहे. राज्य सरकारने दुष्काळ जाहीर केल्यानंतर आता दुष्काळग्रस्त जनतेला प्रत्यक्ष दिलासा मिळण्यासाठी राज्यपालांनी या प्रश्नाची गांभीर्याने दखल घ्यावी, तसेच दुष्काळग्रस्त भागाचा प्रत्यक्ष दौरा करून परिस्थितीची पाहणी करावी, अशी मागणी आष्टी-पाटोदा-शिरूर कासार विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार भीमराव आनंदराव धोंडे यांनी राज्यपालांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



माजी आमदार भीमराव धोंडे यांनी राज्यपालांसह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच महसूल मंत्री व दुष्काळ निवारण समितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडेही निवेदन सादर करून दुष्काळग्रस्त भागासाठी तातडीने विशेष मदत करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यांत अपुरा व अनियमित पाऊस, घटलेली भूजलपातळी आणि सिंचनाच्या अपुऱ्या सुविधा यामुळे दरवर्षी पाणीटंचाईची समस्या गंभीर होत आहे. यंदाच्या दुष्काळामुळे शेती, पशुधन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम झाला असून, शासनाने दुष्काळ जाहीर केल्यानंतर मदतीच्या निर्णयाला विलंब होऊ नये. शेतकरी आणि पशुपालकांना धीर देण्यासाठी तातडीने आर्थिक मदत, चारा आणि पाण्याची व्यवस्था करावी, तसेच राज्यपालांनी शासनाकडे पाठपुरावा करून ही मदत लवकर उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी धोंडे यांनी केली आहे.

दुष्काळामुळे ऊस, सोयाबीन, तूर, कापूस, उडीद आणि बाजरी या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रति एकर ५० हजार रुपये आर्थिक मदत देण्यात यावी. तसेच दुष्काळामुळे बाधित झालेल्या फळबाग उत्पादक शेतकऱ्यांना प्रति एकर एक लाख रुपयांचे विशेष अनुदान द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

पशुधनासाठी चारा आणि पाण्याची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असल्याने मोठ्या जनावरांसाठी दररोज १०० रुपये आणि लहान जनावरांसाठी दररोज ५० रुपये चारा व पाणी अनुदान थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करावे, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. दुष्काळग्रस्त गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची प्रक्रिया सुलभ करून ग्रामपंचायतींना थेट टँकर मंजुरीचे अधिकार द्यावेत, जेणेकरून नागरिकांना वेळेत पाणी उपलब्ध होईल, असेही धोंडे यांनी नमूद केले आहे.

जमीन नसलेल्या शेतमजूर आणि कामगारांवरही दुष्काळाचा मोठा परिणाम झाला आहे. त्यामुळे दुष्काळाच्या काळात भूमिहीन शेतमजूर व कामगारांना प्रत्येकी २५ हजार रुपये आर्थिक सहाय्य द्यावे. तसेच दुष्काळग्रस्त शेतकरी व नागरिकांना विशेष अन्नधान्याचा पुरवठा करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

दुष्काळ निवारणासोबतच भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी रोजगार हमी योजनेतून जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घ्यावीत. ही कामे स्थानिक मजुरांच्या माध्यमातून करून त्यांना रोजगार उपलब्ध करून द्यावा. शक्य तितकी कामे यंत्राद्वारे न करता स्थानिक पातळीवर मजुरांच्या सहभागातून राबवावीत, अशी मागणी धोंडे यांनी केली आहे.

आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यांसाठी कायमस्वरूपी पाणीपुरवठा योजना राबविणे अत्यावश्यक असून, गोदावरी-कृष्णा खोऱ्यातील उपलब्ध पाणी दुष्काळी भागात आणण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रकल्पांना तातडीने गती द्यावी, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. केवळ तात्पुरत्या उपाययोजनांवर अवलंबून न राहता या तीनही तालुक्यांसाठी दीर्घकालीन पाणीपुरवठा आणि सिंचनाचे नियोजन करावे, असेही धोंडे यांनी स्पष्ट केले आहे.

दुष्काळग्रस्त जनतेला तातडीचा दिलासा देण्यासाठी पाणी, चारा, टँकर, पीक नुकसानभरपाई, फळबाग अनुदान, शेतमजुरांना आर्थिक मदत आणि रोजगाराच्या उपाययोजनांचा समावेश असलेले विशेष दुष्काळ निवारण पॅकेज तातडीने मंजूर करावे. तसेच राज्यपालांनी आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यांचा प्रत्यक्ष दौरा करून शेतकरी, पशुपालक व नागरिकांच्या समस्या जाणून घ्याव्यात आणि शासनाला आवश्यक त्या उपाययोजनांसाठी निर्देश द्यावेत, अशी मागणी माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केली आहे.

# प्राजक्ताताईंवर बिनबुडाचे आरोप करून माता-भगिनींचा अपमान करू नका; अश्विनी भांडेकरांचा आजबेंना घणाघाती सवाल

मानूर प्रतिनिधी ह्व

माता-भगिनींचा आदर करतो, असे सांगायचे आणि दुसरीकडे एका महिलेवर वैयक्तिक व बिनबुडाचे आरोप करायचे, ही कोणती संस्कृती? आमदार सुरेश अण्णा धस यांच्या पत्नी तथा प्राजक्ताताई धस यांनी मतदारसंघातील महिलांसाठी बचतगटांच्या माध्यमातून आर्थिक आधार उभा केला, विविध सामाजिक उपक्रम राबविले आणि सर्वसामान्यांच्या सुख-दुःखात सहभागी होत काम केले. अशा महिलेवर आरोप करणे म्हणजे केवळ त्यांचा अपमान नव्हे, तर मतदारसंघातील तमाम माता-भगिनींच्या सन्मानाला धक्का पोहोचविणे आहे, असा घणाघाती सवाल शिरूरकासार नगरपंचायतीच्या नगरसेविका अश्विनी गणेश भांडेकर यांनी माजी आमदार बाळासाहेब आजबे यांना केला.

महिलांसाठी प्रत्यक्ष काम करणाऱ्या प्राजक्ताताई धस यांच्यावर आरोप करण्यापूर्वी आजबे यांनी आपली वक्तव्ये आणि त्यामागील पुरावे जनतेसमोर मांडावेत. राजकीय मतभेद असू शकतात; मात्र महिलांना वैयक्तिक आरोपांचे लक्ष्य बनविणे योग्य नाही. एखाद्या महिलेच्या प्रतिष्ठेवर आघात करणारी वक्तव्ये करण्यापेक्षा महिलांच्या प्रश्नांवर आणि मतदारसंघाच्या विकासावर बोलण्याचे धाडस दाखवावे, असे अश्विनी भांडेकर यांनी सुनावले.

'महिलेवर आरोप करण्यापेक्षा आधी आपल्या पाच वर्षांच्या आमदारकीचा हिशेब द्या,' असा थेट सवालही त्यांनी केला. आपल्या कार्यकाळात दळणवळणासाठी किती रस्ते केले, गावागावांतील पाणीप्रश्न किती सोडविले, सिंचनाची किती कामे केली, याचा हिशेब जनतेसमोर मांडावा.



गावागावांत शेड देऊन कार्यकर्त्यांचे भले केले जात असल्याचे सांगितले जात असेल, तर त्या कामांचा खर्च, दर्जा आणि लाभार्थी यांची माहितीही जनतेसमोर जाहीर करावी, अशी मागणी अश्विनी भांडेकर यांनी केली.

शेडच्या कामांमध्ये टक्केवारी घेतल्याचे आरोप होत होते आणि कामे नातेवाईकांकडून करून घेण्याचा आग्रह का होता, याचेही स्पष्टीकरण आजबे यांनी द्यावे. वडिलांच्या कार्यकाळातील सिंचनाची कामे स्वतःच्या कार्यकाळातील विकासकामे म्हणून दाखवून जनतेची दिशाभूल करू नये, असेही अश्विनी भांडेकर यांनी स्पष्ट केले.

राजकारणात आरोप-प्रत्यारोप होत राहतील; पण महिलांच्या सन्मानाची रेषा ओलांडली जाऊ नये. प्राजक्ताताईंनी महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी केलेल्या कामाचा आदर करण्याऐवजी त्यांच्यावर आरोप करणे योग्य नाही. आधी स्वतःच्या पाच वर्षांच्या कामाचा हिशेब द्या आणि मग इतरांवर प्रश्न उपस्थित करा, असे आव्हान नगरसेविका अश्विनी भांडेकर यांनी आजबे यांना दिले.

# योगेश्वरी पॉलिटेक्निकमध्ये स्थापत्य अभियांत्रिकीतील करिअर संधींवर व्याख्यान

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी पॉलिटेक्निक, अंबाजोगाई येथील ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलच्या वतीने स्थापत्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी 'उर-ीशशी जीीींपिळीं ळप उर्ळीीळश्र एप-सळपशशीळपस' या विषयावर विशेष मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. दि. ५ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता नागापूरकर सभागृह येथे हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

संस्थेचे अध्यक्ष मा.चंद्रशेखर बर्दापूरकर यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच उद्योग व रोजगार क्षेत्रातील प्रत्यक्ष संधींची माहिती मिळावी, बदलत्या तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने आवश्यक कौशल्यांची जाणीव व्हावी आणि विद्यार्थ्यांच्या करिअरला योग्य दिशा मिळावी, या उद्देशाने या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य रमण देशपांडे यांनी केले. त्यांनी स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रातील बदलत्या स्वरूपाचा आढावा घेत विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासक्रमापुरते मर्यादित न राहता उद्योगक्षेत्राच्या गरजा ओळखून विविध तांत्रिक व व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करण्याचे आवाहन केले.

यावेळी छत्रपती संभाजीनगर येथील श्री.परिमल मराठे व सौ.स्नेहा मराठे यांनी विद्यार्थ्यांना 'उरीशशी जीीींपिळीं ळप उर्ळीीळश्र एपसळपशशीळपस' या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. स्थापत्य अभियांत्रिकी पदविका पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांसमोर उपलब्ध असलेल्या विविध करिअरच्या वाटा, रोजगाराच्या संधी, उच्च शिक्षणाच्या संधी तसेच खासगी व शासकीय क्षेत्रातील संभाव्य संधींबाबत त्यांनी माहिती दिली.

विद्यार्थ्यांना उद्योगविश्वाशी जोडणे, रोजगाराच्या बदलत्या संधींची माहिती करून देणे आणि त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासोबतच करिअर घडविण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या व्याख्यानाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. शाम गडदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. के. पी. इंगोले यांनी केले. या कार्यक्रमास स्थापत्य अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अभियंता शिवराज पाटील यांना सेवानिवृत्त झाल्याबद्दल भावपूर्ण निरोप

अंबाजोगाई( प्रतिनिधी)- येथील मांजरा वसाहती मधील पाटबंधारे संशोधन उपविभागातील उपविभागीय अभियंता शिवराज पाटील हे ३३ वर्षाच्या सेवेनंतर नियत वयोमनानुसार ३० सप्टेंबर रोजी सेवानिवृत्त झाल्याबद्दल त्यांना कर्मचाऱ्यांच्या वतीने भावपूर्ण निरोप देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अभियंता एस व्ही शिराढोणकर तर प्रमुख पाहुणे म्हणून जलसंधारण अधिकारी हनवते हे होते. प्रारंभी अध्यक्ष यांच्या हस्ते शिवराज



पाटील आणि त्यांच्या पत्नी सौ. सविता पाटील यांचा कर्मचाऱ्यांच्या वतीने शाल श्रीफळ आणि भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. श्रीयुत पाटील यांनी जवळपास ३३ वर्ष परळी ,पाथर्डी, अहिल्यानगर, जळगाव, लातूर ,धाराशिव आणि अंबाजोगाई येथे केल्याची माहिती आपल्या प्रास्ताविकामध्ये कनिष्ठ अभियंता एस एस ढाका यांनी दिली. या कार्यक्रमांमध्ये श्रीयुत पाटील यांच्या कार्याचा गौरव करणारी फुरकाउद्दीन, ए एम पाटील, हर्षदा शिरसाट, एसटी शिंदे, एम एम कुलकर्णी, श्री हनवते, देशमुख, झुबडे ,स्वराज पाटील आणि पूनम पाटील यांची समायोचित भाषणे झाली श्रीयुत शिवराज पाटील आणि त्यांच्या पत्नी सविता पाटील यांची सत्काराला उत्तर देणारी भाषणे झाली. या कार्यक्रमाला मांजरा वसाहती मधील जलसंपदा उपविभागातील अधिकारी तानाजी लोमटे, शत्रुघन मुंडे, बालाजी मुंडे आणि अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीयुत एस. एस. ढाका यांनी करून शेवटी आभार मानले.

# मरणोत्तर परोपकार: घाटनांदूरच्या ७४ वर्षीय गोदावरीबाई जाधव यांचे वैद्यकीय महाविद्यालयाला देहदान

अंबाजोगाई: -प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदूर येथील ७४ वर्षीय गोदावरीबाई दगडू जाधव यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांची अंतिम इच्छा पूर्ण करत त्यांचा देह आंबेजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाला दान केला आहे. मरणोत्तर देहदान करून गोदावरीबाईंनी समाजापुढे एक अत्यंत प्रेरणादायी आणि महान आदर्श ठेवला आहे.

वैद्यकीय संशोधनासाठी महत्त्वपूर्ण पाऊल

गोदावरीबाई जाधव यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. हयातीत अतिशय प्रेमळ आणि मनमिळाऊ स्वभाव असलेल्या गोदावरीबाईंनी आपल्या मृत्यूनंतर देहदान करण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यांच्या पश्चात जाधव कुटुंबीयांनी दुःख बाजूला ठेवून त्यांच्या इच्छेचा आदर केला. वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संशोधनासाठी आणि मानवी शरीररचनेचा सखोल अभ्यास करण्यासाठी त्यांनी गोदावरीबाईंचा देह वैद्यकीय महाविद्यालयाकडे सुपूर्द केला. या देहदानातून भविष्यात हजारो रुग्णांचे प्राण वाचवणारे कुशल डॉक्टर घडण्यास मोठी मदत होणार आहे.

ग्रामीण भागासाठी दिशादर्शक निर्णय

ग्रामीण भागात आजही देहदानाबाबत अनेक गैरसमज आणि अंधश्रद्धा पाहायला मिळतात. अशा परिस्थितीत घाटनांदूरसारख्या गावातून एका वयस्कर महिलेने असा पुरोगामी विचार करणे आणि तिच्या पश्चात कुटुंबीयांनी तो प्रत्यक्ष अमलात आणणे ही बाब अत्यंत कौतुकास्पद आहे. जाधव कुटुंबीयांनी जपलेली ही सामाजिक बांधिलकी आणि त्यांनी दिलेला हा परोपकाराचा संदेश समाजातील इतरांसाठीही देहदानाचे महत्त्व अधोरेखित करणारा ठरला आहे. त्यांच्या या उदात्त निर्णयाचे सर्वच स्तरातून स्वागत होत आहे.

# ‘बोले तैसा चाले’ या तत्वाचे शिवाजीराव (दादा) पंडित- ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज पठाडे

## कीर्तन महोत्सवाला महिला व पुरुष भाविक भक्तांचा उत्स्फुर्त प्रतिसाद
## अमरसिंह पंडित, जयसिंग पंडित यांची प्रमुख उपस्थिती

गेवराई (प्रतिनिधी) संत तुकाराम महाराजांच्या ‘बोले तैसा चाले, त्याची वंदीन पाऊले’ या अभंगातील विचाराला आपल्या जीवनात प्रत्यक्ष उतरविणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित आहेत. शब्दाला जागणारे, निष्कलंक, संस्कारक्षम, क्षमाशील वृत्ती आणि समाजातील शेवटच्या घटकाचा विचार करणारे बापमाणूस म्हणून शिवाजीराव दादा पंडित यांच्याकडे पाहता येईल. वयाची ८९ वर्षे पूर्ण झाली असतानाही समाजसेवेची तळमळ त्यांच्या मनात आजही कायम आहे, म्हणूनच त्यांचे हे खरे अभिष्टचिंतन आहे असे प्रतिपादन युवा कीर्तनकार ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज पठाडे यांनी केले. माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित श्रीराम कथा ज्ञानयज्ञ व कीर्तन महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी कीर्तनाचे पुष्प गुंफताना ते बोलत होते. यावेळी माजी आमदार अमरसिंह पंडित, शिवशारदा मल्टीस्टेट चे संस्थापक अध्यक्ष जयसिंग पंडित यांच्यासह अभिष्टचिंतन सोहळ्याचे पदाधिकारी, कार्यकर्ते व मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. विशेषतः महिला भाविकांनी कीर्तनाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज पठाडे यांनी संत तुकाराम महाराजांच्या ‘बोले तैसा चाले, त्याची वंदीन पाऊले’ या अभंगावर निरूपण केले. अतिशय सोप्या आणि सहज भाषेत संत तुकाराम महाराजांच्या विचारांचा अर्थ स्पष्ट करत त्यांनी उपस्थितांना जीवन जगण्याचा संदेश दिला. बोलणे सोपे असते; मात्र ते कृतीत आणणे कठीण असते. शब्द देणे सोपे, पण दिलेला शब्द सांभाळणे अवघड असते. त्यामुळे तुकाराम महाराजांच्या विचारांप्रमाणे आचरण करण्याची गरज आहे, असे त्यांनी सांगितले.

आपल्या मार्मिक शैलीत सद्यस्थितीवर भाष्य करताना महाराज म्हणाले, आज सर्वत्र कुठे ना कुठे ‘फुटी’चे वातावरण दिसते. नेते फुटतात, माणसे फुटतात, पेपर फुटतात; मात्र ढग काही फुटत नाहीत. ढग फुटले तर शेतकरी सुखी होईल, असा मिश्कील टोला त्यांनी लगावला. शेतकऱ्यांच्या संकटाची जाणीव ठेवत पाऊस पडून त्यांच्या पाण्याचा प्रश्न मिटावा आणि शेतीला पुन्हा उभारी मिळावी, अशी प्रार्थनाही त्यांनी ईश्वरचरणी केली.

शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रश्नावरही त्यांनी अत्यंत भावनिक आवाहन केले.



गेलेले पीक पुन्हा घेता येते, कर्ज फेडता येते; मात्र हा मनुष्य जन्म पुन्हा मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी कोणत्याही परिस्थितीत आत्महत्येचा मार्ग स्वीकारू नये, तर संकटाशी दोन हात करून पुन्हा उभे राहावे, असे आवाहन ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज पठाडे यांनी केले.संत तुकाराम महाराजांच्या विचारांची सांगड शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या प्रदीर्घ सामाजिक आणि सार्वजनिक जीवनाशी घालत महाराजांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला. त्यामुळे संपूर्ण कीर्तनादरम्यान भाविकांमध्ये भक्तिभावासोबतच सामाजिक जाणीवेचे वातावरण निर्माण झाले. यावेळी अभिष्टचिंतन सोहळा समितीचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते आणि भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव चाटे यांनी केले.

अमरसिंह पंडित, जयसिंग पंडित यांनी घेतला मनमुराद आनंद

किर्तन प्रसंगी माजी आमदार अमरसिंह पंडित आणि शिवशारदा मल्टीस्टेटचे संस्थापक अध्यक्ष जयसिंग पंडित यांनी पठाडे महाराजांच्या रसाळ कीर्तनाचा मनमुराद आनंद घेतला. कीर्तनातील विविध प्रसंग, अभंग आणि महाराजांच्या प्रभावी निरूपणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. यावेळी अमरसिंह पंडित व जयसिंग पंडित हेही कीर्तनात तल्लीन झाल्याचे पाहायला मिळाले.

भजनसम्राट तुळशिराम आतकरे यांच्या गायनाने भाविक मंत्रमुग्ध

किर्तन महोत्सवात दुसऱ्या दिवशी सायंकाळी भजन सम्राट डॉ. तुळशीराम आतकरे यांचे संगीत भजन बहारदार झाले. यावेळी त्यांनी विविध संतांच्या रचना, अभंग गवळणी आपल्या गोड आवाजात सादर करून उपस्थित भाविक भक्तांना मंत्रमुग्ध केले. यावेळी त्यांना प्रदीप बोराडे यांनी पखवाजावर तर पवन उदे यांनी तबल्यावर साथ दिली. ज्ञानेश्वर गायकवाड, राम धोंडरे रामेश्वर वारे यांच्यासह स्वरकल्याण संगीत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी कोरस साथ दिली.

---

# बाळासाहेब आजबे भान ठेवून बोला-सौ.अयोध्या शेळके सरपंच

## मॅडम शब्दाचा वापर कोणासाठी केला?

मानूर (प्रतिनिधी)

जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात आलेल्या जनआक्रोश मोर्चात माजी आमदार बाळासाहेब आजबे यांनी जे भाषण केले त्या भाषणात त्यांनी दुष्काळ/पाणी प्रश्नावर बोलण्याऐवजी धस परिवारावर टीका करण्यात धन्यता मानली असून यापुढे भान ठेवून बोला अन्यथा आम्हालाही आमच्या खुमासदार शैलीत उत्तर द्यावे लागेल असा इशारा नांदेवालीच्या भाजपाच्या सरपंच सौ.अयोध्या शेळके यांनी दिला आहे.राज्यातील जनता दुष्काळात होरपळत असताना आपण जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून जनतेच्या मनात राहण्याचा केविलवाणा प्रयत्न केला खरा परंतु भाषण करताना आपल्याला मात्र वस्तुस्थितीचे भान राहिले नाही.आपण आमदार सुरेश धस आणि त्यांच्या परिवारातील सदस्यांवर विशेष करून महानंदाच्या संचालिका तथा अण्णांच्या सुविद्य पत्नी प्राजक्ता ताई धस यांच्यावर तोंडसुख घेतले.त्यानंतर पत्रकार परिषद घेऊन मी मॅडम असा शब्द वापरल्याचा दाखला दिला.वास्तविक पाहता तुम्हाला धस परिवारावर बोलण्याचा कोणताही नैतिक अधिकार नसताना तुम्ही जे बोललात ते धादांत खोटे असून आपण मॅडम या शब्दाचा वापर कोणासाठी केला याचे उत्तर द्या असे देखील सौ.अयोध्या शेळके आणी इतर महिलांनी पत्रकात नमूद केले आहे.आमदार सुरेश अण्णा



धस आणि त्यांच्या परिवारातील प्रत्येक सदस्य मतदारसंघातील जनतेच्या सुखदुःखात सहभागी असतो त्यामुळेच जनता त्यांच्या झोळीत मतांची शिदोरी भरभरून टाकत असते.आपल्याला अपघाताने एकदा संधी मिळाली परंतु त्या संधीचे सोने तुम्हाला करता आले नाही.आपल्या कार्यकाळात आपल्याला विकास तर करता आलाच नाही पण आमदार सुरेश अण्णा धस आणि त्यांचा परिवार पायाला भिंगरी लावून जनतेची कामे करत असताना देखील आपल्याला पहावत नाही हे दुर्दैव म्हणावे लागेल.यापुढे भान ठेवून बोला अन्यथा आम्हालाही आमच्या मर्यादा ओलांडून उत्तर द्यावे लागेल असा इशारा माजी आमदार बाळासाहेब आजबे यांना महिला विषयी बोलताना शब्द जपून वापरा असा पत्रकातुन दिला आहे.वास्तविक पाहता येथे भर सभेत मॅडम चे नाव घेण्याची गरजच काय?असे देखील त्यांनी पत्रकात म्हटले आहे.

---

# माजी आ.भीमराव धोंडे हे बीड जिल्ह्याचे ‘यशवंतराव चव्हाण’ : प्रा.डॉ.सतीश साळुंखे

कडा येथील जिल्हास्तरीय शेतकरी लेखक साहित्य संमेलनाचा उत्साहात समारोप

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) महाराष्ट्राचे दिवंगत मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्याप्रमाणेच आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे माजी आमदार तथा महाराष्ट्र भूषण भीमराव धोंडे हे कलावंत, साहित्यिक, विचारवंत आणि बळीराजाचे खंबीर पाठीराखे आहेत. सातत्यपूर्ण सामाजिक, साहित्यिक उपक्रम आणि दूरदृष्टीमुळे भीमराव धोंडे हे खऱ्या अर्थाने बीड जिल्ह्याचे ‘यशवंतराव चव्हाण’ आहेत, असे गौरवोद्गार बीड जिल्हास्तरीय शेतकरी लेखक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. डॉ. सतीश साळुंखे यांनी काढले.

महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभाग व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या अनुदानातून तसेच आनंद चॅरिटेबल संस्था, आष्टी संचलित आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बीड जिल्हास्तरीय शेतकरी लेखक साहित्य संमेलनाचा समारोप उत्साहात झाला. यावेळी प्रा. डॉ. साळुंखे बोलत होते.

समारोप कार्यक्रमास व्यासपीठावर प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते, ज्येष्ठ नेते बाबुशेठ भंडारी, राजूकाका धोंडे, प्रा. डॉ.



सय्यद अल्लाउद्दीन, कवी नागेश शेलार, हरीश हातवटे, ज्येष्ठ पत्रकार उत्तमराव बोडखे, अहिल्यानगरचे पत्रकार भगवान राऊत, प्रा. डॉ. विनोद ढोबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रा. डॉ. साळुंखे पुढे म्हणाले की, सत्ता असो अथवा नसो, भीमराव धोंडे यांनी पहिल्यांदा आमदार झाल्यापासून आजतागायत विविध सामाजिक व साहित्यिक उपक्रमांची परंपरा कायम ठेवली आहे. वडिलांच्या स्मृतीप्रित्यर्थ ते दरवर्षी ‘गंगाई बाबाजी महोत्सव’ आयोजित करतात. तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणीजनांना ‘गंगाई बाबाजी आदर्श पुरस्कार’ देऊन सन्मानित करतात. त्यांच्या या उपक्रमांतून त्यांचा व्यापक सामाजिक व सांस्कृतिक दृष्टिकोन दिसून येतो.

या संमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी भीमराव धोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली अहोरात्र परिश्रम घेणारे संयोजन समितीचे कार्याध्यक्ष तथा प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांचा प्रा. डॉ. साळुंखे यांनी ‘नियोजनाचार्य’ असा गौरव केला. ग्रंथदिंडीपासून ते संमेलनाच्या समारोपापर्यंतचे संपूर्ण नियोजन व व्यवस्थापन डॉ. विधाते व त्यांच्या सहकाऱ्यांनी अत्यंत चोखपणे पार पाडल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी ज्येष्ठ कवी प्रा. डॉ. सय्यद अल्लाउद्दीन यांनी संमेलनात ग्रामीण कथाकार भास्कर बडे यांच्या झालेल्या मुलाखतीचा संदर्भ देत सांगितले की, भास्कर बडे यांच्या ३५ वर्षांच्या संघर्षमय साहित्यिक प्रवासातून साहित्यप्रेमींना मोठी प्रेरणा मिळाली आहे. यापुढील साहित्य संमेलनांमध्ये स्थानिक ग्रामीण साहित्यिकांच्या प्रकट मुलाखतींचा आवर्जून समावेश करण्यात यावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. ज्येष्ठ नेते बाबुशेठ भंडारी यांनी भीमराव धोंडे यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, साहित्य, कला, क्रीडा आणि राजकारण अशा विविध क्षेत्रांत गेल्या ५० वर्षांत भीमराव धोंडे यांनी स्वतःचा वेगळा ठसा उमटविला आहे. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी त्यांनी मुंबई-दिल्लीसह विविध ठिकाणी आंदोलने केली असून, अलीकडेच दुष्काळी प्रश्नांवर बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर काढलेल्या मोर्चाचीही जनमानसात ठळक नोंद झाली आहे. समारोप समारंभात प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते यांच्या हस्ते उपस्थित सर्व मान्यवरांचा शाल, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. बी. एस. खैरे यांनी केले. उपस्थित मान्यवर, साहित्यिक व कवींचे राजूकाका धोंडे यांनी आभार मानले. संमेलन यशस्वी करण्यासाठी डॉ. डी. बी. राऊत, प्राचार्य अशोक गदादे, डॉ. पी. एन. औटे, प्रा. दादासाहेब काळे, प्राचार्य कर्ण तावरे, उपप्राचार्य डॉ. संजय धोंडे, मुख्याधिकारी संजय कोथमीरे, विजयकुमार शिंदे, प्रा. डॉ. जी. पी. बोडखे, प्रा. डॉ. एस. डी. गायकवाड, प्रा. बी. ए. रणदिवे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

---



# अंबाजोगाईत मोकाट कुत्र्यांच्या हल्ल्यात बालकाचा मृत्यू

दोषींवर कडक कारवाई करा आणि पीडित कुटुंबाला २५ लाखांची मदत द्या!

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई शहरातील रोशन कॉलनी येथे मोकाट श्वानांच्या हल्ल्यात अवघ्या ६ वर्षांच्या फरहान मोहम्मद कुरेशी या चिमुरड्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेच्या पार्श्वभूमीवर प्रकरणाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करून दोषींची जबाबदारी निश्चित करावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.यासंदर्भात आज उपजिल्हाधिकारी कार्यालय, अंबाजोगाई येथे निवेदन सादर करण्यात आले. श्वान नियंत्रणाच्या कामकाजातील प्रशासकीय तसेच आर्थिक व्यवहारांची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.श्वान नियंत्रणाचे काम कोणत्या संस्था, कंपनी अथवा कंत्राटदाराला देण्यात आले, यासंदर्भातील निविदा, करारपत्रे, वर्क ऑर्डर, श्वान पकडल्याच्या नोंदी, उपलब्ध निधी, बिले तसेच करण्यात आलेली देयके यांची स्वतंत्र प्रशासकीय व आर्थिक चौकशी करण्यात यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

तसेच, चौकशीदरम्यान निष्काळजीपणा, फौजदारी स्वरूपाची जबाबदारी निष्पन्न झाल्यास भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील लागू तरतुदींनुसार गुन्हा दाखल करून संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशीही मागणी करण्यात आली.पीडित फरहानच्या कुटुंबाला अंबाजोगाई नगरपरिषदेमार्फत तातडीने २५,००,०००/- (पंचवीस लाख रुपये) आर्थिक मदत देण्यात यावी. तसेच भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी अंबाजोगाई शहरातील मोकाट श्वानांच्या नियंत्रणासाठी प्रभावी आणि जबाबदार यंत्रणा उभारावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

---

# आधार वृद्धाश्रमातील ज्येष्ठांशी लोकनेते आ.सुरेश धस यांचा मनमोकळा संवाद

## सर्जेराव देशमुख यांच्या सेवाभावी कार्याचे आ.धस यांच्याकडून कौतुक

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टा, ता. वाळवा, जि. सांगली येथील आधार वृद्धाश्रमाला आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार लोकनेते सुरेश धस यांनी सदिच्छा भेट देत वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांशी मनमोकळा संवाद साधला. यावेळी त्यांनी निराधार ज्येष्ठ नागरिकांची आस्थेने विचारपूस करून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. तसेच वृद्धाश्रमातील जेवणाच्या व्यवस्थेची प्रत्यक्ष पाहणी करून तेथील सुविधांची माहिती घेतली. आयुष्याच्या उत्तरार्धात आधाराची गरज असलेल्या ज्येष्ठ नागरिकांची मायेने आणि आपुलकीने केली जाणारी सेवा पाहून आ. धस यांनी समाधान व्यक्त केले.

आधार वृद्धाश्रमात निराधार, अनाथ तसेच कुटुंबीयांकडून आधार न मिळालेल्या ज्येष्ठ नागरिकांना मायेची ऊब, प्रेम, आपुलकी आणि सन्मानाने जगण्याचा आधार दिला जातो. विशेष म्हणजे, गेल्या १५ वर्षांहून अधिक काळ कोणतेही शासकीय अनुदान न घेता केवळ लोकसहभागातून तसेच दानशूर व्यक्तींच्या मदतीवर या वृद्धाश्रमाचा कारभार सुरू आहे. समाजातील दातृत्वशील व्यक्तींच्या सहकार्यामुळे ज्येष्ठ नागरिकांच्या निवास, भोजन



आणि औषधोपचाराची व्यवस्था केली जात आहे.वृद्धाश्रमाचे संचालक सर्जेराव देशमुख हे सध्या पोटच्या मुलांकडून सांभाळ केला जात नसलेल्या तसेच निराधार झालेल्या सुमारे ३० ते ३५ ज्येष्ठ नागरिकांची मायेने काळजी घेत आहेत. त्यांच्या राहण्याची, जेवणाची तसेच औषधोपचाराची व्यवस्था करून देशमुख हे सातत्याने ज्येष्ठांना आधार देत आहेत. कोणत्याही शासकीय अनुदानाशिवाय केवळ लोकसहभाग आणि दानशूर व्यक्तींच्या मदतीच्या बळावर गेल्या अनेक वर्षांपासून हे सेवाकार्य अखंडपणे सुरू ठेवणे ही निश्चितच कौतुकास्पद आणि प्रेरणादायी बाब असल्याचे आ. सुरेश धस यांनी यावेळी सांगितले.

वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधताना आ. धस भावुक झाले. आयुष्यभर कुटुंबासाठी आणि समाजासाठी योगदान देणाऱ्या ज्येष्ठांना वृद्धापकाळात प्रेमाचे दोन शब्द, आपुलकीची साथ आणि सन्मानाची वागणूक मिळणे आवश्यक आहे. ज्येष्ठ नागरिकांची सेवा करणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि त्यांना आधार देणे हीच खरी माणुसकी असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

निराधार ज्येष्ठ नागरिकांची अखंड सेवा करणारे सर्जेराव देशमुख यांच्या सेवाभावी कार्याचे आ. सुरेश धस यांनी विशेष कौतुक केले. यावेळी देशमुख यांचा सत्कार करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. तसेच आधार वृद्धाश्रमाच्या भविष्यातील गरजा लक्षात घेऊन आवश्यक ती सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासनही आ. धस यांनी दिले. आमदारांची ही भेट वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांसाठी आपुलकीचा आणि भावनिक आधार देणारी ठरली.

# वोट चोर गद्दी छोड़!लोकशाही रक्षणासाठी मुंबईत जनसागर

## उद्धव ठाकरे-राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली गर्जना मोर्चा



मुंबई, : मतदार यादीतील कथित अनियमितता आणि निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेच्या मुद्द्यावरून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत 'गर्जना मोर्चा' काढण्यात आला. या मोर्चाला महाविकास आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेससह विविध विरोधी पक्षांच्या नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून पाठिंबा दिला.

मोर्चाला संबोधित करताना राज ठाकरे यांनी मतचोरीच्या मुद्द्यावरून निवडणूक प्रक्रियेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. 'मी २०१७ पासून मतचोरी होत असल्याचे सांगत आहे,' असा दावा त्यांनी केला. यासंदर्भात आपण काँग्रेसच्या नेत्या सोनिया गांधी आणि तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी यांची भेट घेतल्याचेही त्यांनी सांगितले.

२०२४ च्या निवडणुकीत महायुतीला बहुमत



मिळाले असले तरी महाराष्ट्रात अपेक्षित जल्लोष किंवा उत्साह दिसला नाही, असा दावा राज ठाकरे यांनी केला. मतदारसंख्येतील वाढीवरही त्यांनी प्रश्न उपस्थित करत लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या आकडेवारीची छाननी करण्याची मागणी केली.'विधानसभा निवडणुकीच्या वेळी मतदार वाढवायचे आणि त्यातून सत्ता मिळवायची, तर एसआयआरच्या माध्यमातून दोन कोटी मतदार वगळायचे, हे कोण करीत आहे?' असा सवाल राज ठाकरे यांनी उपस्थित केला. एसआयआर प्रक्रियेच्या अंमलबजावणीवरही त्यांनी आक्षेप घेतला. माजी केंद्रीय गृहसचिव आर. के. सिंह यांच्या मताचा दाखला देत एसआयआर ही अपवादात्मक परिस्थितीतच केली जाऊ शकते, असा दावा त्यांनी केला.

दरम्यान, उद्धव ठाकरे यांनी केंद्रातील भाजपप्रणीत सरकारवरही टीका केली. भाजपला सरकार चालविता येत नसून प्रशासनाच्या माध्यमातून सूडाचे राजकारण केले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या नियुक्ती प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित करत ती पक्षपाती असल्याचा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला.निवडणूक प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास कायम ठेवण्यासाठी मतदार याद्या, निवडणूक प्रक्रिया आणि एसआयआर संदर्भातील निर्णयांमध्ये पारदर्शकता आवश्यक असल्याची भूमिका या मोर्चातून मांडण्यात आली.

# कोंडागावात भाजप सरकारविरोधात ओबीसी समाजाचा एल्गार!



**५० हजारांहून अधिक नागरिकांचा सहभाग; आरक्षणासह विविध मागण्यांसाठी जोरदार आंदोलन**

कोंडागाव : आपल्या विविध मागण्या आणि हक्कांसाठी कोंडागाव येथे आज मागासवर्गीय समाज मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरला. ५० हजारांहून अधिक नागरिकांनी या आंदोलनात सहभागी होत भाजप सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.आरक्षणासह मागासवर्गीय समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले. यावेळी ओबीसी समाजाच्या हक्कांसाठी आंदोलकांनी एकजुटीने आवाज बुलंद केला.मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाल्याने कोंडागाव शहरात आंदोलनाचे वातावरण निर्माण झाले होते. ओबीसी समाजाच्या मागण्यांवर सरकारने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# ना झुकली, ना थांबली ;दिल्लीच्या रस्त्यांवर नेहा बोरा यांना पुन्हा ताब्यात



दिल्ली : राजधानी दिल्लीतील आंदोलनादरम्यान पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त आणि बॅरिकेड्सचा वेढा असतानाही नेहा बोरा यांनी आपला आवाज बुलंद ठेवला. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी त्यांना पुन्हा ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे.नेहा बोरा यांच्या आंदोलनाला रोखण्यासाठी दिल्लीच्या रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. बॅरिकेड्स उभारून आंदोलकांना रोखण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, या कारवाईनंतरही आपल्या मागण्यांवर ठाम राहण्याची भूमिका नेहा बोरा यांनी कायम ठेवली.त्यांच्या समर्थकांकडून ही कारवाई लोकशाही मार्गाने सुरू असलेल्या संघर्षाचा आवाज दडपण्याचा प्रयत्न असल्याची टीका करण्यात आली. तर, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाई केल्याचे सांगितले जात आहे.नेहा बोरा यांना ताब्यात घेतल्याने आंदोलनाचा मुद्दा अधिक चर्चेत आला असून, त्यांच्या पुढील भूमिकेकडे समर्थकांसह राजकीय व सामाजिक क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

## बीड जिल्हा प्रशासनात संवेदनशीलतेचा दुष्काळ!

# पवनचक्की कंपन्यांच्या सूचनेवरून १५ मिनिटांत घटनास्थळी दाखल होणारे प्रशासन

बीड : कधी ओला तर कधी कोरडा दुष्काळ, नापिकी, कर्जबाजारीपणा आणि मुलींच्या लग्नाची आर्थिक विवंचना यामुळे बीड जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत आहेत. एकीकडे प्रशासन शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचा दावा करत असले तरी प्रत्यक्षात महसूल व पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीत संवेदनशीलतेचा अभाव दिसून येत असल्याची संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी दिली आहे.दि. ३ रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश पंचक्रोशीतील पिंपरनई येथील शेतकरी विक्रम बाबासाहेब दाभाडे यांनी नापिकी, दुष्काळ, मुलीच्या लग्नाची आर्थिक विवंचना आदी कारणांमुळे स्वतःच्या शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. वडिलांचा शोध घेण्यासाठी शेतात आलेल्या मुलीला त्यांचा मृतदेह झाडाला लटकलेल्या अवस्थेत आढळून आला.या घटनेची माहिती ग्रामस्थांनी सकाळी सुमारे ८ वाजता फोनवरून पोलीस प्रशासनाला दिली होती. मात्र, महसूल व पोलीस प्रशासन घटनास्थळी दाखल होऊन मृतदेह खाली घेण्यास तब्बल तीन तासांचा कालावधी लागला. सकाळी ११ वाजता मृतदेह खाली घेण्यात आला, असा दावा डॉ. गणेश ढवळे यांनी केला आहे.पवनचक्की कंपन्यांच्या सूचनेवरून अवघ्या १५ मिनिटांत घटनास्थळी पोहोचणारे प्रशासन शेतकरी आत्महत्येच्या घटनेत मात्र तीन तास का लावते? असा संतप्त सवाल डॉ. गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत प्रशासनाची ही उदासीनता म्हणजे जिल्ह्यातील संवेदनशीलतेचा दुष्काळ असल्याची टीकाही त्यांनी केली.

शेतकरी आत्महत्यांची ६० प्रकरणे प्रलंबित; आत्महत्याग्रस्त कुटुंबे शासकीय मदतीपासून वंचित!बीड जिल्हा प्रशासनाच्या अधिकृत आकडेवारीनुसार, १ जानेवारी ते ११ सप्टेंबर या कालावधीत जिल्ह्यात १५७ शेतकरी आत्महत्यांची नोंद झाली आहे. त्यापैकी ८२ प्रकरणे पात्र, तर १५ प्रकरणे अपात्र ठरविण्यात आली आहेत. मात्र तब्बल ६० प्रकरणे अद्याप तालुकास्तरावर प्रलंबित असल्याचा दावा डॉ.गणेश ढवळे यांनी केला आहे.

स्थानिक महसूल व पोलीस प्रशासनातील समन्वयाच्या अभावामुळे आत्महत्यांमुळे उद्ध्वस्त झालेल्या कुटुंबांना मिळणारी तुटपुंजी शासकीय मदतही वेळेत मिळत नसल्याने संबंधित कुटुंबीयांना प्रशासनाच्या कार्यालयांचे हेलपाटे मारावे लागत आहेत, असा आरोप त्यांनी केला

या प्रलंबित प्रकरणांपैकी २६ प्रकरणे दोन महिन्यांपासून, २४ प्रकरणे एक महिन्यापासून, ६ प्रकरणे चार महिन्यांपासून, तर ३ प्रकरणे तीन महिन्यांपासून प्रलंबित आहेत. परळी तालुक्यातील एक प्रकरण तब्बल आठ महिन्यांपासून प्रलंबित असल्याचा दावा करण्यात आला आहे.

प्रलंबित प्रकरणांची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करा!

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शासकीय मदतीपासून वंचित ठेवणाऱ्या प्रलंबित प्रकरणांची सखोल चौकशी करून संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी आणि दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.याबाबत त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या



माध्यमातून मुख्यमंत्री, प्रधान सचिव,उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार आणि कृषिमंत्री दत्तामामा भरणे यांना लेखी निवेदन दिले आहे.

# वयाच्या ७९व्या वर्षी डॉ. दशरथ भोसले यांचे दोन विनोदी कथासंग्रह प्रकाशित

पुणे : वयाच्या ७९व्या वर्षी ज्येष्ठ विनोदी लेखक डॉ. दशरथ दाजीराव भोसले यांच्या 'काकांना अटॅक येतो..! ' आणि 'म्हातारपणाचं टॉनिक' या दोन विनोदी कथासंग्रहांचा प्रकाशन सोहळा पुण्यातील वीर बाजी पासलकर सभागृहात उत्साहात पार पडला. या वेळी ज्येष्ठ साहित्यिक म्हणून डॉ. भोसले यांचा सत्कार डॉ. एस. एन. पठाण, माजी कुलगुरू, नागपूर विद्यापीठ यांच्या हस्ते करण्यात आला.डॉ. दशरथ भोसले हे एम.ए., पीएच.डी. असून कोकण कृषी विद्यापीठात सहाय्यक कुलसचिव म्हणून सेवा बजावून निवृत्त झाले आहेत. 'रथ मांगल्याचा' हे त्यांचे यापूर्वी प्रकाशित झालेले पुस्तक असून त्यांच्या साहित्यिक प्रवासात आता या दोन विनोदी कथासंग्रहांची भर पडली आहे.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ. एस. एन. पठाण म्हणाले की, आजची पिढी आई-वडील, नातेवाईक आणि संस्कृतीपासून दूर जात आहे. त्यामुळे आपला सांस्कृतिक वारसा जपण्याची गरज आहे. डॉ. भोसले यांच्या दोन्ही कथासंग्रहांत समाजातील विविध वैगुण्यांवर विनोदी शैलीत भाष्य करण्यात आले आहे. हे विनोद केवळ हसविणारे नसून वाचकाला अंतर्मुख करून विचार करायला भाग पाडणारे आहेत. स्वार्थी वृत्तीमुळे नातेसंबंधांमध्ये निर्माण होणारी वेदना त्यांच्या लेखनातून विनोदाच्या माध्यमातून व्यक्त होते. कोकणातील संस्कृती, सण-उत्सव, माणसे आणि परस्परांतील जिव्हाळाही त्यांच्या लेखनातून प्रभावीपणे समोर येतो.प्रमुख पाहुण्या तथा नेटल्स प्रकाशन, दिल्लीच्या मालक व प्रकाशक कुमारी अनुरंजिता पाठक यांनी सांगितले की, नवोदित लेखकांना संधी देण्याच्या उद्देशाने प्रकाशन संस्था सुरू करण्यात आली आहे. डॉ. भोसले यांच्या पुस्तकांचे संपादन करताना त्यांच्या विषयांची निवड आणि लेखनातील वेगळेपण सातत्याने जाणवले.डॉ. भारत द. कऱ्हाड यांनी या पुस्तकांच्या निर्मितीमागील प्रवास सांगताना म्हटले की, विविध सभा आणि कार्यक्रमांमध्ये डॉ. भोसले यांच्या बोलण्यातून त्यांची विनोदी शैली प्रकर्षाने जाणवत असे. त्यामुळे त्यांना 'आपण लिहीत का नाही?' असे विचारले. त्यावर डॉ. भोसले यांनी 'मी लिहीन, तुम्ही मला मदत करा,' असे सांगितले. त्यानंतर सलग ५२ आठवडे, दर रविवारी एक विनोदी कथा लिहून घेण्यात आली. या लेखनातूनच या दोन कथासंग्रहांची निर्मिती झाली. या उपक्रमासाठी परळी येथील संपादक मोहन व्हावळे यांच्या 'संघर्ष नेता' या वृत्तपत्राचे सहकार्य लाभल्याचे डॉ. कऱ्हाड यांनी




सांगितले.आपल्या मनोगतात डॉ. दशरथ भोसले यांनी प्राचार्य डॉ. भारत द. कऱ्हाड हे या पुस्तकांच्या निर्मितीमागील प्रेरणास्थान असल्याचे सांगितले. पत्नी, सून, मुलगा, मुलगी आणि नातू यांच्या प्रेरणेमुळे लेखन सुरू ठेवता आले. दर आठवड्याला लिहिलेली कथा कुटुंबीयांना वाचून दाखवली जात असे आणि त्यांच्या सूचनांमुळे लेखन अधिक समृद्ध होत गेले. कोकण कृषी विद्यापीठातील सहकाऱ्यांनीही दर रविवारी प्रसिद्ध होणाऱ्या लेखाला मनापासून दाद दिल्याने लेखनाची प्रेरणा मिळत राहिली. 'लेखन आणि नातू हे दोन्ही आता माझ्या म्हातारपणाचे टॉनिक झाले आहे,' असे भावपूर्ण उद्गार त्यांनी काढले.

यावेळी ड. वैशाली नितीन भोसले यांनीही मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाच्या सुरुवातीला आरोही प्रशांत शिंदे आणि अदा युवराज शिंदे यांनी गणेशवंदना सादर केली. या कार्यक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे लेखकाच्या कुटुंबातील तीन पिढ्या एकत्रितपणे उपस्थित होत्या.कार्यक्रमास पुणे शहर काँग्रेसचे उपाध्यक्ष श्री. आबा जगताप, डॉ. सुधाकर न्हाळदे, प्राचार्य डॉ. अनिल अडसुळे, माजी प्राचार्य डॉ. राजेश कुचेकर, डॉ. सुरेश वाघमारे, डॉ. अशोक कांबळे, डॉ. स्नेहलता तावरे, डॉ. परेश वाघमारे, डॉ. सुवर्णा कराड, श्री. विलास घडवले, उमीत तळेकर, सौ. योगिता मधुकर कदम, संजीवनी गावणकर, सौ. प्रितम, ओंकार विचारे, निशीका नितीन भोसले, संयोजक नितीन भोसले, युवराज भोसले, ड. सौ. वैशाली नितीन भोसले यांच्यासह भोसले कुटुंबीय तसेच साहित्य, कला आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सौ. शिल्पा प्रशांत शिंदे यांनी केले. आभार प्रदर्शन सौ. सोनाली राजकुमार मगर यांनी केले. वयाच्या ७९व्या वर्षी दोन विनोदी कथासंग्रह प्रकाशित होणे आणि लेखकाच्या कुटुंबातील तीन पिढ्यांची उपस्थिती यामुळे हा सोहळा डॉ. दशरथ भोसले यांच्या साहित्यिक वाटचालीतील एक संस्मरणीय टप्पा ठरला.

# राज्यस्तरीय रोल बॉल स्पर्धेत बीडचा डबल धमाका; मुली उपविजेत्या, मुलांना तृतीय क्रमांक

बीड (प्रतिनिधी) : यवतमाळ येथे झालेल्या १६ व्या मिनी (११ वर्षांखालील) महाराष्ट्र राज्य रोल बॉल अजिंक्यपद स्पर्धेत बीड जिल्ह्याने दिमाखदार दुहेरी यश मिळविले. बीडच्या मुलींच्या संघाने उपविजेतेपद तर मुलांच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावत जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला.महाराष्ट्र रोल बॉल असोसिएशन व यवतमाळ जिल्हा रोल बॉल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ३ व ४ ऑक्टोबर २०२६ रोजी स्कूल ऑफ स्कॉलर्स, एम.आय.डी.सी. दारव्हा रोड, यवतमाळ येथे ही स्पर्धा पार पडली. राज्यातील ३५ हून अधिक




जिल्ह्यांच्या संघांनी स्पर्धेत सहभाग घेतला.

मुलींची दमदार कामगिरी

बीडच्या मुलींच्या संघाने साखळी फेरीपासूनच आक्रमक व उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत अंतिम फेरी गाठली. अंतिम सामन्यात बीड व पुणे संघात अटीतटीची लढत झाली. या सामन्यात बीडला ६-७ असा निसटता पराभव स्वीकारावा लागल्याने संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.उपविजेत्या बीड संघात आनंदी रमेश्वर घोडके, अंझिला अहद शेख, प्रियल नितीन धांडे, मैत्रेयी अनिकेत कुलकर्णी, श्रेया सतीश बेटकर, रिया प्रवीण कोलंगडे, उमे सलमा झोहरा यांचा समावेश होता.

मुलांनीही पटकावला कांस्यपदकाचा मान

मुलांच्या गटातही बीडच्या संघाने सुरुवातीपासूनच दमदार खेळ करत तृतीय क्रमांक पटकावला. कांस्यपदकाच्या लढतीत प्रतिस्पर्धी संघावर मात करत बीडच्या मुलांनी हे यश मिळविले.तृतीय क्रमांकाच्या संघात जय दिनकर सुपेकर, प्रणय सुधीर हजारे, अथर्व दिलीप गोरे, सिदनाक बापूसाहेब वाघमारे, निकुंज राजेश तोष्णीवाल, अद्वित प्रदीप ससाणे, राघव रामेश्वर घोडके, हमाद साखेब इमरान मोमिन, अनय अमोल मोहळकर, दर्श हरिओम धुप्पड आणि राज गणेश नहार यांचा समावेश होता.या दोन्ही संघांना प्रशिक्षक वैभव हरिश्चंद्र गिरी, सुधीर शंकरराव हजारे आणि निकिता कुंडलिक भोसले यांचे मार्गदर्शन लाभले.बीड जिल्ह्याच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल जिल्हा सचिव रामदास अश्रुबा गिरी, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, क्रीडा अधिकारी अनिकेत काळे, शिक्षक, पालक व क्रीडाप्रेमींनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले असून, आगामी राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



**बीडच्या माजी खासदार तथा लोकनेत्या स्व. केशरकाकू क्षीरसागर यांच्या विसाव्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन! भाजपा युवा नेते योगेश भैया व ताईसाहेब,नगरसेवक तथा योगेश भैया मित्र मंडळ**

# अगं बा बो... अहिल्यानगरहून रेल्वे शनिशिंगणापूर मार्गे थेट संभाजीनगरला जाणार



अहिल्यानगर। प्रशांत बाफना

अहिल्यानगर ते छत्रपती संभाजीनगर (शनिशिंगणापूर मार्गे) प्रस्तावित नवीन रेल्वे प्रकल्प आणि त्याशी जोडल्या गेलेल्या रेल्वे जाळ्याबाबतची महत्त्वाची माहिती व अद्ययावत स्थिती खालीलप्रमाणे आहे प्रस्तावित दुहेरी मार्ग व डीपीआर: छत्रपती संभाजीनगर ते अहिल्यानगर (अहमदनगर) हा सुमारे ८५ ते ९० किमीचा मार्ग विद्युतीकरणासह दुहेरी रेल्वे लाईन म्हणून प्रस्तावित करण्यात आला आहे. यासाठी सुमारे २,२३५ ते २,९०० कोटींचा सविस्तर प्रकल्प अहवाल (उ्झठ) तयार करून केंद्र सरकारच्या मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे.शनिशिंगणापूरचा समावेश: या अहिल्यानगर - छत्रपती संभाजीनगर मुख्य मार्गाच्या आराखड्यात शनिशिंगणापूर हे महत्त्वाचे रेल्वे स्टेशन म्हणून समाविष्ट करण्यात आले आहे. राहुरी-शनिशिंगणापूर जोडमार्ग: अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी ते शनिशिंगणापूर (२१.८४ किमी) या स्वतंत्र जोडमार्गाला केंद्र सरकारने 'विशेष रेल्वे प्रकल्प' म्हणून मंजुरी दिली असून, याचे भूसंपादन व सर्वेक्षणाचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. भाविकांसाठी सोयीचा प्रवास: सध्या शनिशिंगणापूर येथे जाण्यासाठी थेट रेल्वे मार्ग उपलब्ध नाही. मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) आणि उत्तर महाराष्ट्रातून येणाऱ्या लाखो भाविकांना यामुळे थेट रेल्वे कनेक्टिव्हिटी मिळेल.